# स्वीटी महाले



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# रे पतंगा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# रे पतंगा

लेखिका

स्वीटी सुभाष महाले

# रे पतंगा

## लेखक. स्वीटी सुभाष महाले

मु. पो. जाचकवाडी, (बेलापूर) तालुका - अकोले जिल्हा - अहमदनगर,
पिन कोड - ४२२६०२
मोबाईल - 8308732305
इ-मेल - sweetimahale2018@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : ४ नोव्हेंबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

**मनोगत** -



स्वतःची अशी काही ओळख करुन द्यायला काही विशेष नाही माझ्याकडे. माझा जन्म 29/8/1998 चा. मी पदवीधर आहे "बॅचलर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन" पदवी मिळवली आहे. लहानपणा पासून वाचनाची आवड होती, मला आठवते शाळेतल्या पाच दहा पानांच्या बालकथांपासून सुरवात झाली होती, दहावीत रात्र रात्र जागून कादंबऱ्या संपवल्याचा आनंदही घेतला, कॉलेजमध्ये असताना मोकळ्या वेळात जमेल तेवढा वेळ पुस्तक वाचण्यात घालवी. सोबत रोजचे बदलणारे पुस्तकही वेगळे.

शाळेत असताना दहावीत गेल्यावर मी पहिल्यांदाच एक कथा लिहिली चार पाच पानांची ती कथा माझं पहिलं वहिलं लिखाण, त्यानंतर बारावीत असताना एक कादंबरी लिहिली; मात्र ती आजही कच्च्या पानांवर लिहून पडली आहे. मागे वाळून पाहताना चार पाच वर्षांपूर्वी काढलेला फोटो पाहिल्यावर जसं होतं, लेखकांना अगदी तसंच काहीसं ते जुनं लिखाण पाहून वाटत असावं, बाकीच्यांचं माहीत

नाही, मात्र माझं अगदी असंच होतं. शेवटी हळूहळू लेखणीत बदल होत जातोच आणि तो गरजेचाही असतो, हळूहळू का होईना योग्य दिशेने वाटचाल चालू झाली आहे असं म्हणायला हरकत नाही. मी एक निसर्गात रमणारी व्यक्ती आहे. शांत तळयाच्या काठीही तासनतास बसूनही मला तो वेळ अपुरा वाटतो. डोंगर दऱ्यात गाणारी कोकिळा, पाण्याचा झुळझुळ आवाज, पाखरांची चिवचिव, मंद वाऱ्याचा सुगंध मनात साठवत राहते. म्हणून हा निर्मळ सहवास फारच भावतो. पहिल्या प्रकाशना संदर्भात म्हणाल तर गमती गमतीत काहीतरी लिहिलं आणि त्यानं मला नवी ओळखच देऊ केली.

तनुही माझ्या खुपच जवळची अगदी माझीच प्रतिकृती असल्यानं मी तिला जास्त जवळून अनुभवता आलं, आणि आता तुमच्या भेटीला आलेली शिवनंदा मात्र याच्या अगदी उलट शांत, संयमी, अबोल, समंजस अशी शिवनंदा पहिल्या दिवशी अलिप्त होती. आमचं काही जमता जमेना. एखादा प्रसंग लिहिताना ती अशा परिस्थितीत कशी वागेल या विचारात दिवस जायचा. मात्र हळूहळू ती माझ्याशी सवांद साधू लागली, लेखकाचं ते सौभाग्यच म्हंटलं तरी वावगे नाही, लेखक स्वतःच तयार केलेल्या एखाद्या काल्पनिक पात्राला आयुष्याचा भाग म्हणून लिहितो. कालांतराने ते पात्र इतके जवळचे होऊन जाते की त्याचं अस्तित्व खरं वाटू लागतं.

सर्वात आधी तर सर्व वाचकांचे मनापासून खूप खूप आभार. फुंकरीची वादळे या पुस्तकाच्या रूपाने माझं पाहिलं पुस्तक

वाचकांसमोर ठेवलं आणि प्रकाशनाच्या दुसऱ्या दिवसापासून अक्षरशः मॅसेज, ई-मेल, आणि फोनकॉल्सचा पाऊस पडायला लागला. पहिल्याच लिखाणाला एवढं भरभरून प्रेम आणि प्रतिसाद दिल्या बद्दल सर्व वाचकांचे मनापासून आभार. त्या दिवसापासून आजपर्यंतही वाचक आपल्या प्रतिक्रिया देतच आहेत हे बघून मोठे समाधान वाटते. बरेच दिवस वाचकांच्या भेटीला आले नाही याचे दुःख होते, मात्र आता पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीला रे पतंगा च्या रूपाने येत आहे.

शिवनंदा मनात आली तशी कागदावर उतरवण्याचा ध्यास घेतला, तेवढा काळ मी तिला जगत होते. प्रत्येक क्षण तिच्या सहवासात जात होता, तिला काहीच दिवसांत लिहून पूर्ण केलं खरं; मात्र यावर खरं काम ते करायचं सुनील सामंत सरांनी शिकवलं त्यासाठी त्यांचे मनापासून आभार.

रे पतंगाच्या निमित्ताने उलगडत जाणार तिचा प्रवास जणू मीही अनुभवत होते, यातली प्रत्येक पात्र माझ्याशी हसत होती, रडत होती. मनात आली तशी कागदावर उतरवत गेले.

अजूनही मला शिकण्यासाठी अखंड साहित्यसंपदेची माया शिल्लक आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. थोडक्यात अजून तितकेसे उमदे लिखाण निपजत नाही असे मला स्वतःला वाटते. मात्र तरीही वाचकांची प्रेमळ प्रांजळ मते फार दिलासा देतात. कित्येक नवीन लेखकांशी, वाचकांशी ओळख झाली! कित्येक लोक संपर्कात आली जी आजही जिव्हाळयाचा विषय आहेत. थोडक्यात आमच्यासारख्या

नवख्या लेखकांवर विश्वास ठेवून संधी दिल्याबद्दल इसाहित्य आभार मानावे तितके थोडे.

आणि हो या वेळी मात्र नियम तेच आहेत बरं का तुमचे एक दोन मिनिटं जातील तेवढ्या वेळात पुस्तक वाचून झाल्यावर मनात जे काही येईल, अगदी आंबट, गोड, तुरट, तिखट काहीही जे असेल ते कळवा, यामुळे नवी उभारी येते आणि प्रचंड आत्मविश्वास मिळतो.

पुन्हा कधी लिहिणार हाही काही वाचकांचा प्रेमळ आग्रह आठवला की नवी प्रेरणा मिळते, आपली फक्त काही मिनिटं माझ्या कलेला नवी उभारी द्यायला नक्कीच उपयोगी येतील

**स्वीटी महाले.**

अर्पण पत्रिका .

... सतत लिहिण्यास प्रेरणा देणारे नाना नानी, ताई दादा आणि नेहमी लिहिण्यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या सर्व मित्रमैत्रिणी आणि सर्व वाचकांस समर्पित..

सदर कथाही पुर्णपणे काल्पनिक कथा असून याचा कुठल्याही जिवंत किव्वा मृत व्यक्तीशी कुठल्याही प्रकारचा संबंध नाही. तसे आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा.

# रे पतंगा

## *शिवनंदा..*

स्वयंपाकओट्यावर चहा उकळण्याची वाट पाहत मी किशोर कुमारच गाणं गुणगुणत उभी होते.

***पल भर के लिये कोई हमे प्यार करले झुटाही सही. ला ला ला ला ला.***

मागे देवघरात देव्हाऱ्याजवळ बसलेल्या अप्पांना ऐकू जाऊ नये अशाच बेतानं माझं गाणं सुरू होतं.

अप्पांचं नेहमीप्रमाणे अगदी शेजारच्या चार घरातही स्पष्टपणे ऐकू जाईल अशा आवाजात मारुती स्त्रोत म्हणायचं काम गेली अनेक वर्षे अखंडित पणे चालू होतं, मारुती रायाचे निस्सीम भक्त असलेले आमचे अप्पा, यांनी लग्नही चुकूनच केले असावं असं मला नेहमी वाटायचं,

तसही मी पाच वर्षांची असतानाच आई निर्वातली, त्यांनतर अप्पांनी पुन्हा बोहल्यावर चढावे आणि लग्नाचा विचार करावा म्हणून सगळ्या नातलगांनी प्रयत्न करून पाहिले, आजीने तर घर सोडून जाईल अशी धमकी देऊन पहिली. पण काही फरक पडला नाही,

कदाचित मारुतीच्या भक्तीमध्ये तल्लीन आयुष्य कंठावे

आणि एकदा केली ती चूक पुन्हा नको असं काहीसं त्यांच्या मनात येत असावं असं मला राहून राहून वाटायचं..

अगं ये शिवनंदा चहा आणते का! अप्पांचा राकट आवाज नेहमीच दम भरल्यासारखा वाटायचा. आवाज कानावर पडल्यावर घाई घाईने अण्णांपुढे चहा नेऊन ठेवला.

"अ.. हे घ्या अप्पा"! अप्पांनी सुरका मारत पहिला घोट घेतला.

अरे रे!! हे काय गं कारटे! चहामध्ये साखर घालायला काय तुझी आई येणार आहे का वरून स्वर्गातून खाली!! अप्पांचा पुन्हा तोच दम भरल्या सारखा आवाज ऐकून त्या भारदस्त आवाजाने मी गडबडले!

अग् बाई! मघाशी त्या गाण्याच्या नादात साखर टाकायची विसरून गेले वाटतं! स्वतःशीच पुटपुटत जीभ चावत मी आप्पांचा तो चहाचा कप घेऊन आत पळाले!

आजी खोकत अंथरुणावर पडली होती,

“अगं नंदे.  मला पण आणतेस का चहा!” झोपल्या झोपल्या आजीने आवाज दिला!

“आले गं!” आजीच्या आवाज ऐकल्याऐकल्या तितक्याच घाईने मी ओ दिली. “उठली का गं? घे गरम गरम चहा पिऊन घे.”

एव्हाना अप्पा धोतर नेसून अंगावर कोट चढवत असताना डोक्यात घालायची टोपी मिळेना म्हणून ते आपल्या भक्कम आवाजात पुन्हा एकदा ओरडले. “ये अगं नंदे माझी टोपी कुठे ठेवली?. कितीदा सांगितलं वस्तू जागेवर मिळतील तर शप्पत!” अप्पांची किरकिर चालू असतानाच मी घाईघाईने त्यांच्या हातात टोपी दिली.

कॉलेजात नाटकात काम करायचे स्वप्न कितीदा रंगून झाले होते. आरश्यासमोर उभी राहून नाटक करण्यात मला भारीच मौज वाटे. पण अप्पांना याबद्दल विचारायची हिम्मत मात्र कधी झाली नाही!

मनात आश्रित असलेल्या त्याच भीतीनं नकळत माझी स्वतःची अशी एक बाजू आहे, स्वतःचे असे एक अस्तिव आहे, हे मी विसरून गेले होते. फुलाने बहरताना आपल्या सुगंधावर बंदी घालावी पक्ष्यांनी आपला चिवचिवाट विसरुन जगावं, पाण्याने आपला खळखळाट गिळून शांत राहावं असं मिळमिळीत आयुष्य मी जगते आहे असं मला राहून राहून वाटत असे. त्या भीतीच्या अनामिक आश्रिताने माझा "स्व" गिळंकृत केला होता. मनात

बसलेली, दीर्घायुषी असलेली ती भीती तिला धक्का लावायचं काम कुणी करू शकेल का? हा निरुत्तरीत प्रश्न कायमचाच ॥

मात्र माझी नियती याहून वेगळी असावी.

अप्पा तसे मनाने मात्र फार हळवे, पण राग मात्र नेहमी नाकाच्या शेंड्यावर असे.

थेट अप्पांना विचारायचे त्यापेक्षा आजीचे मत घेऊन पाहावे म्हणून मी एकदा आजीसमोर हा विषय काढून पहिला. तेव्हा आजी माझ्यावरच ओरडत म्हणाली! तिच्या बोलण्यात राग, चीड, आणि काळजी असे संमिश्र भाव जाणवले.

"काय? नाटक? बाई बाई बाई आमच्या वेळी नव्हतं बाई असं काही! हल्लीच्या तरुण पिढीला कशात रस वाटेल, काही काही सांगता येत नाही बाई."

"अगं आता चांगली एकोणीस वर्षाची घोडी झालीस की. बाईच्या जातील कशाला पाहिजे हे असले नाद! तुझ्या एवढी होते तेव्हा दोन मुलं होती पदरात माझ्या!" थोडं रागे भरून ती क्षणभर शांत झाली.

"बापाने तरी तुला अजून कशी ठेवली? आता तरी मनावर घे सांगायला पाहिजे मुकुंदाला! आमच्या वेळी नव्हतं असं काही."

आता हे चार वेळा ’आमच्या वेळी नव्हतं असं काही” असं बोलायची गरज होती का?

“आज्जी. आजी ऐक ना! नाही ते नाटक वगैरे नाही करत. पण बाई अप्पांना काही सांगू नको! हा!” माझ्या केविलवाण्या चेहऱ्यावर ओझरती नजर फिरवत तिने हातातली जपमाळ पुढे सरकवायला सुरुवात केली.

मनात म्हंटलं नाहीतर खरंच माझ्या लग्नच मनावर घ्यायचे लगेच! उगाच हिला म्हणाले. हे मात्र स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारख झालं!

तो विषय मात्र मी मनातच ठेवला! मागच्या महिन्यातल्या वक्तृत्व स्पर्धेचं मिळालेलं पाहिलं बक्षीससुद्धा मी माझ्या लाकडी पेटीत लपून ठेवलं होतं. ।

नाही म्हणायला अप्पांना माझं निबंध स्पर्धेच बक्षीस एकदा दाखवलं होत पण अप्पा फार काही त्यावर बोलले नाहीत, त्यांना आवडलं नसावं का? उत्तर तर मिळालं नाही कधी मात्र पुन्हा कधी काही दाखवायची माझी हिम्मत झाली नाही.

सत्तर पंचाहत्तरचा तो काळ, पुण्याच्या नारायण पेठेतल्या एका चाळीत आमचं घर होत. काहीस चाळी सारखं वरती अजून एक माळा असलेलं आमचं घर तस प्रशस्त होत, छोटेखानी वाड्या

सारखं. दर रविवारी आजी न चुकता सगळं घर धूळ जळमटं काढून अरश्या सारख पुसून स्वच्छ करून घ्यायची.

तेव्हा रोज संध्याकाळी ती अंगणातल्या तुळशीत, माजघरात, देवघरात आणि स्वयंपाक घरात दिवे लावायला सांगे. त्या पिवळ्या उजेडाने घर उजळून निघत असे. संध्याकाळी विजेचा वापर नगण्य असायचा आजीच्या त्या दिव्यांचा प्रकाश घरभर आनंद पेरून जाई.

जसं जसं मला कळायला लागलं तेव्हापासून मी आजीला मदत करायची.

आता मात्र तिला पहिल्यासारखी कामं होत नाही. ती थकली, वर्षभरापासून तर तिने खाटच धरली.

हळूहळू ओबडधोबड का होईना मी घरकाम शिकले.

माझ्या हातची जळलेली भाकरी सुद्धा अप्पा कुठलीही तक्रार न करता खात.

एरव्ही मला या ना त्या कारणाने सतत ओरडा खावा लागायचा, मात्र तो तेवढ्या पुरताच,

अप्पाना जेवढा जलद राग यायचा तेवढ्याच पटकन तो निवळूनही जायचा!

माझ्या हातून चव बिघडलेली भाजी असो की अळणी वरण या बाबतीत मात्र त्यांनी कधी कुठली तक्रार केली नाही! हळू हळू मीच त्या गोष्टी शिकून घेतल्यावर मात्र आज भाजी उत्तम जमलीय हो नंदे. असं रोज कानावर यायला लागलं. या निमित्ताने अप्पा दोन घास जास्त जेवतात हेच ते काय समाधान.

हात धुवून पानाला नमस्कार करून अण्णा धोतराचा लोळ सावरत उठले की भलाथोरला ढेकर देत असत. त्या नंतर काठोकाठ भरलेलं पोट सांभाळत ते धोतराचा सोगा हातात धरून चाळीखालच्या पारावर जाऊन बसत! रोज रात्रीच्या वेळी दहा अकरा वाजे पर्यंत खाली सगळ्या टग्यांची मैफिल रंगली असायची! आमक्याच्या पोरीचं तमक्याशी सूत जुळलं तमक्याचा पोर रुसून गेलं. खालच्या अळीतल्या कोणाला नोकरी लागली, कोणाची बायको नांदत नाही इथून तर जागतिक बाजार पेठेत काय चाललंय इथं पर्यंत यथोचित सविस्तर गप्पांगण इथे रंगायच!

यांचा हसण्या-खिदळण्याचा आवाज वरपर्यंत यायचा.

नेहमी प्रमाणे मी माझ्या आवडत्या किशोर कुमारचं गाणं गुणगुणत मी खिडकीतून खाली डोकावलं.

पलीकडच्या चाळीतले धोंडोपंत उर्फ धोंडो काका, सिगारेटचा झुरका नाकावाटे सोडत म्हणाले,

ऐकतोस का रे मुकुंदा तुझ्या नंदासाठी एक उत्तम स्थळ पाहण्यात आहे!! नाकातल्या नाकात उच्चारलेल्या " ण " वरच त्यांचं प्रेम नेहमीच दिसून येई.

करतो का विचार यंदा? तसेही आपली नंदा आता वयात आली. एखादा उपवर मुलगा बघून उडवून देऊ बार! काय समजलास? पुन्हा एकदा नाकावाटे धुराची वाट मोकळी करत धोंडोपंत हीं हीं करत हसले.

शेजारी कान देऊन बसलेले दामोदरराव धोतराचा सोगा नाकात सरकवत पुढची वार्ता ऐकविण्यास उत्सुक दिसायला लागले, आ.. श्चिई.. करत फॅट कण शिंकत. त्याच सोग्याने पुन्हा नाक पुसत त्यांनी पुढची माहिती पुरवली.

“मुलगा सरकारी नोकरीत आहे उत्तम नोकरी आहे आणि शिवाय जमीनही भरपूर आहे. मी म्हणतो तू या स्थळाचा तरी विचार करावयास हरकत नाही!”

माझ्या लग्नाविषयीच्या ओझरत्या गप्पा कानी येत होत्या. मात्र ते ऐकण्यात मला फारसा रस नव्हता.

अप्पा गप्पांसाठी खाली उतरले की मी हळू आवाजात रेडिओ चालू करी तासभर माझ्या आवडीची संगीतमय दुनिया अनुभवी.

किशोर कुमारचं

*ओ मेरे दिल के चैन!*

*चैन आये मेरे दिल को दुआ कीजिए!*

मराठीतल्या घाणेकरांची

*" गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय"!*

तासभर गाणे ऐकत मी त्यात रमून जायची.

**हसले आधी कुणी तू? का मी?**

**तू? का मी?**

मग उशिराने अप्पा घरी आले की गडबडून ती प्रेमगीते बंद करून मी धार्मिक चॅनेल लावायला गेले की

अर्धा वेळ ती खरखर ऐकण्यात जायचा. की आप्पा चिडक्या स्वरात वैतागून म्हणत, नंदे . बंद कर बघू आधी ती किरकिर! मी म्हणतो झोपायच्या वेळी हवी कशाला ती खरखर डोक्याजवळ? निजा आता पुरे झाले! हेही अप्पांच कारड्या आवाजातलं वाक्य ठरलेलं पण आज मात्र अप्पा काही बोलले नाहीत याच नवल वाटलं, शेवटी कंटाळून मी स्वतःच तो रेडिओ बंद करून माझ्या खोलीत गेले. आमच्या चार खोल्यांच्या घरात माणसं कमी असल्याने, माझ्या वाट्याला स्वतंत्र खोली मात्र मिळाली होती नशिबाने!! तोच काय तो आनंद.

सकाळी लवकर उठुन मला कॉलेजात जायचं होतं. त्यासाठी पाटकण निजून माझ्या आवडत्या फिल्मी दुनियेची स्वप्न बघत स्वप्नाच्या कृत्रिम झुल्यात झुलायला मोकळी झाले! त्यावेळी नकळत कधी मी कल्पनाविलासात रंगून जाई. अर्धचंद्राच्या धूसर प्रकाशात खुलणारी प्रीती अनुभवी, तर कधी लडिवाळ हट्ट करून गाल फुगवून प्रितरंगांचे दर्शन देणारा प्रियकर पाही! मुक्त वाऱ्यासह मोहरणारा माझा सुगंध चोहीकडे पसरतो आहे असेही कधी वाटे.

भल्या पहाटे अप्पा उठून अंघोळ करत मग. मारुती स्त्रोत आणि जप आरती पूजा सर्व मिळून दोन एक तास पूजा आटोपून ते ध्यानस्थ होत. काही वेळ ध्यानस्थ झाल्यावर सात वाजता बरोबर मला चहासाठी अप्पांची हाक येई! नेहमी प्रमाणे माझं काम आटपून मी सकाळचे तास अटपावे म्हणून घाई घाई अप्पांना चहा पाणी देऊन शेवटचं आरशात न्याहळून पाहू लागले.

अप्पा बऱ्याचदा मस्करी करत म्हणायचे, अगदी तुझ्या आईवर गेली आहेस!!

तुझी आई अगदी अशीच दिसायची, बोलताना त्यांच्या डोळ्यांत दाटणारी आईची आठवण पाणावल्या डोळ्यांमध्ये तरळून जाई.

सावळा रंग मात्र अगदी तसाच उचलला आहेस,! आणि गालावरची खळीही तिचीच घेतली!, आणि स्वयंपाकाचं तर बाळपनीच बाळकडू देऊन गेली वाटते, माझा मात्र एकही गुण घेतलेला दिसत नाही कारटी ने! किमान माझा स्पष्टवक्तेपणा जरी घेतला असता तर बरे झाले असते! असं म्हणून ते आजीला म्हणत बघितलं का आई? तुझी नात आता वयात आली लग्न उरकून टाकावे म्हणतो!! ते वाक्य उच्चारताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि दुःखाची संमिश्र छटा दिसे. त्या स्पष्टवक्तेपणाचा मला मात्र राग येई. स्वतःच स्वतःच्या स्पष्टवक्तेपणाच कौतुक करून घेणारे आमचे अप्पा मी उघड उघड एखाद्या विषयावर बोलण्याचा प्रयत्न केला तर त्याला माझा उद्धटपणा समजत. मग कसा घ्यावा यांचा हा स्पष्टवक्तेपणा.!

तेव्हा आप्पांनी खास माझ्यासाठी म्हणून त्यांच्या डोक्याला लागेल असा आरसा आणला होता. असेल एक सहा साडेसहा फूट उंच. त्या भल्या थोरल्या आरशाच्या खणात मी माझ्या थोड्या फार असलेल्या आवडीच्या गोष्टी ठेवी. तेलाची बाटली, रोज लावायचं काजळ, पावडरचा डबा, आणि डोक्याला लावायचे चाप. असला काहीसा माझा छोटासा नटण्याचा ऐवज होता. माझ्या मैत्रिणी म्हणायच्या तुला नटायची काही गरजच नाही नंदा. तू तशीच खूप सुंदर दिसतेस, नेहमी कशी टवटवीत फुलासारखी असते,

हे मात्र खरं होत .जेव्हा पासून पहिल्या वर्गाला प्रवेश घेतला तेव्हा पासून अनेक भुंगे माझ्या मागे पुढे भिरभिरत असत, मात्र मला कधी त्यातला कोणी मनात भरेल असा वाटला नाही, त्यापेक्षा मी कधी कोणाकडे मान वर करून पहिलेच नाही. कोणी बोलायला जरी आला तरी अप्पांचा रागीट चेहरा डोळ्यासमोर आला का कोणाकडे पहायची इच्छा होत नसे.

छानशी चापून डोक्याची सागर वेणी घातली डाव्या बाजूला चाफ्याचे फुल लावलं, कपाळावर टिकली चिकटवत घातलेला नव्या साडीला पुन्हा एकदा नीट आहे का नाही निरखून पाहिलं!

"शी बाई"! हल्ली कोण घालत साडी!! "अप्पांच आपलं काहीतरीच, " कॉलेजमध्ये मुली मस्त सलवार घालतात, हवी तशी फॅशन करायला सगळी मुभा असते त्यांना, काही तर जिन्स घालतात किती आत्मविश्वास असतो त्यांच्या चालण्यात देखील.मी क्षणभर स्वतःला त्या पोशाखात आठवून पाहिलं. घालायचे तर सोडाच पण कधी मनात विचारही करून न पहिल्याने मला ते चित्र डोळ्यासमोर ठिकसं काही उभे करता येईना.

असो आता काय करणार! पण तसंही मला साडी जास्त खुलून दिसते असे सर्व म्हणतात, उद्या लग्न होईल मग सासरी हेच घालावे लागेल नं!

बाई गं! लग्न,? मीही काय विचार करत बसले. बऱ्याच वेळा पासून स्वतःला न्याहळत मी विचारांच्या तंद्रीत हरवले होते की

अप्पांच्या खर्र्र्र्रकन दरवाजा लोटण्याचा आवाजाने मी भानावर आले. अरे देवा अप्पा गेले वाटतं, तरी मी इथेच. आजी येते गं दुपार पर्यंत असं म्हणत दोनतीन पुस्तक हातावर घेऊन खाली उतरले, अंगणात उभी असलेली सायकल माझी वाटच पाहत होती मागे पुस्तक अडकून मी घाईने फर्ग्युसनकडे निघाले.

पहिला तास चुकणार बहुतेक मी स्वतःशीच बडबडत निघालेच होते की रस्त्यात सविता भेटली.

तिलाही माझ्यासारखाच उशीर झालेला दिसत होता.

जाऊदे तसही उशीर झालाचं आहे जाऊया सोबत असं म्हणून आम्ही गेट वर पोहोचलोच होतो की आमच्या वर्गातली मुलं बाहेर येताना दिसली. सोबत माझ्या मैत्रिणी, म्हणजे आशा, उमा, सरिता, आनंदी याही होत्याच. "काय झालं? आज काही सुट्टी वगैरे आहे की काय"?

मी आश्चर्याने विचारले. आग् नाही गं आज बालगंधर्वला घाणेकरांचं नाटक आहे पहिला शो आहे सगळे तिकडेच जाणार आता कोणी नाही बसणार तासाला! वर्गातून बाहेर आलेल्या

किलकीलाटातून उमाचा उत्साहानं भरलेला आवाज कानी आला, त्यांचा तो उत्साह पाहून मलाही आतून उकळ्या यायला लागल्या. वाह! नाटक! मस्तच जायला तर पाहिजे. जाऊ का? एका मनाने आपले साशंक मत मांडले

नको!!

आप्पा ना कळलं तर? लगेचच दुसऱ्या मनाने आपली काळजी उपस्थित केली.

पण सांगणार कोण अप्पांना? पाहिलं मन पुन्हा आपल्या चांगुलपणाने दुसऱ्या मनाचा मनसुबा हणून पडण्याचा बेत आखू लागले.

एखादे वेळी गेले गुपचुप तर काय बिघडते! पाहिल्या मनाला आपली बाजू मांडायला जास्त वेळ न देता दुसऱ्या मनाने धुर्तपणे का होईना आपली बाजू रेटून धरली. तरीही आपली बाजू साळसूदपणे मांडत पहिलं मन मला सावध करत म्हणालं. नाही नको हे असं काही बरं नाही! तसही खोटं कोण बोलणारं आहे . फक्त खरं तेवढं सांगणार नाही एवढंच।। माझ्या दोन्ही मनांनी एकमेकांना कोपरखळ्या देत वादविवाद करण्यास सुरुवात केली असताना, याच दुविधेमधे माझी पाऊलं कधी पुढे जाणाऱ्या घोळक्याबरोबर चालायला लागली, माझं मलाच कळलं नाही

.जाऊदे तसंही अप्पा कधी परवानगी देत नाहीत, सगळयांच्या सोबत जायचे घोळक्यात कोणाला काय कळते! आपापली तिकिटं घेऊन आम्ही गर्दीच्या लोंढ्यात सामील झालो.बैठक व्यवस्था पाहून मला माझी खुर्ची मात्र काही सापडेना. तिघी चौघींची शेजारी शेजारी अशी व्यवस्था झाली आणि उरलेल्या आम्ही दोघीतिघी दुसरीकडे अशी काहीशी गडबड झालेली लक्षात आली. आत बराच अंधार होता.

मी बारीक डोळे करून आजु बाजूला पाहत चाललेच होते की काहीसा ओळखीचा आवाज कानी पडल्या सारखं वाटलं. मी गडबडून आजूबाजूला नजर फिरवली. तर समोरच्याच रांगेत कोणीतरी ओळखीची आकृति दिसल्यासारखा भास झाला. " आरे देवा हे तर दामोदर काका"!, नीट निरखून पाहिल्यावर त्याच्या शेजारी अप्पा बसलेले दिसले. नशीबाने नेमकी माझी शोधाशोध ते बसले होते त्याच्या मागच्या रांगेतून चालली होती. अप्पांना पाहून तिथंच पायातील त्राण निघून गेले. जागीच खिळलेली मी क्षणात दूर पळावं असं वाटत असताना कोण्या अज्ञात भीतीनं पाय जखडून टाकले, आणि पाळायचे तर आहे मात्र जागचे हलता येईना अशी काहीशी माझी अवस्था झाली. थोडक्यात काय तर जागेवर खिळून बसले घशाला कोरड पडली. त्या वेळी तिथे आप्पांनी जर मला

पाहिलं असतं तर घरी जाऊन काय तमाशा झाला असता याचा नुसता विचार करूनच मनात धडकी भरली!

तसे शिक्षणासाठी विषेश आग्रही असलेले आमचे अप्पा अभ्यासा व्यतिरिक्त आणखी काहीही करणे म्हणजे त्यांच्या हिशोबाने फक्त वेळ वाया घालवणे असा होता.

शिक्षण हे व्यक्तीसाठी महत्त्वाचे आहे या विचाराने त्यांनी मला महाविद्यालयात प्रवेश घेऊ दिला. दहावी झाल्यानंतर लगेचच चांगली स्थळ सांगून येत असूनही अप्पांनी माझ्या शिक्षणाला महत्व दिलं. मात्र त्यांचा तापट स्वभाव मला चांगलाच परिचयाचा होता, एकदा शाळेत असताना दुपारी कोणालाही न सांगता आम्ही सारसबागेत गेलो. मी शेजारची अनिता आणि सुधाकर नावाचा शाळेतला मित्र आणि शेजारच्या चाळीतलाच शुभंकर असे आम्ही चौघे दिवसभर मनसोक्तपणे खेळून बागडून आमची चांडाळ चौकडी घरी आली, त्या दिवशी नेमके अप्पा शाळेत आले आणि मी तिथे नाही हे पाहून सगळ्यांचीच भंबेरी उडाली. कोणालाही सांगता आम्ही शाळेतून पोबारा केला होता त्यामुळे कोणाला सांगताही येईना आम्ही कुठे गेलो ते.

त्या दिवशी अप्पांना मी पहिल्यांदा एवढं काळजीत पाहिलं. मेटाकुटीला आलेला चेहरा घेऊन ते अंगणातच बसून माझी वाट पाहत होते. संध्याकाळी मी दिवसभराच्या मौजेचा आनंद मनात घोळत त्याच खुशीतच घरी गेले तर अप्पा फक्त रडायचे तेवढे राहिले होते!

गेल्या गेल्या अंगणात तुळशीच्या भिंतीला टेकून बसलेले अप्पा दिसले. पुढे काय घडेल याची पुसटशी कल्पना आली,. तरीही धीम्या गतीनं मी त्यांच्या दिशेने पावले टाकत निघाले. फाटक उघडून आत येणाऱ्या माझ्या आकृतीकडे पाहताना त्यांच्या डोळयात दिसणारी काळजी नाहीशी होऊन त्याजागी आता राग दिसायला लागला. धीमी पाऊल टाकत हलक्या पावलांनी मी जवळ गेले, त्या क्षणी खाडकन कानाखाली बसली. त्यांच्या हाताची पाचही बोट अगदी त्यांच्या हातावरल्या बरीक रेषांसह माझ्या कोवळया गालावर आणि कानावर उमटली होती! बराच वेळ कान फक्त सु... असा वाजत होता.त्या दिवशी मी माझ्या खोलीत मुसमुसून रडले. आई तू हवी होतीस, अप्पा खूप दृष्ट आहेत, कध्दी कध्दी मला प्रेम करत नाहीत, उलट ओरडत असतात. मला तुझी खूप आठवण येते गं. आईचा कधीतरी जत्रेत

काढलेला एक जुना फोटो माझ्याकडे मी सांभाळून ठेवला होता, कधी रडू आले तर तो छातीशी कवटाळून मी रडून घेई.आप्पा मला खूप रागावतात.. तू का गेलीस आई? तेव्हा दरवाजा उघडून आजी आली, आजीने खास माझी समजूत काढायला माझ्या आवडीचे बेसनाचे लाडू बनवले होते, तिने मला समजावत लाडू खाऊ घातले.

आजी फार छान अंगाई गायची ऐकता ऐकता गोड झोप लागायची. मुसमुसतचं आजीच्या मांडीवर डोकं ठेऊन मी पऱ्यांच्या राज्यात प्रवेश केला त्या दिवशी अप्पाही न जेवता झोपलेले असे आजी ने मला नंतर सांगितले. पाचवीत असतानाची गोष्ट. आजही आठवली की अंगावर काटा येतो. आप्पांनी मला सावत्र आईचे दुःख वाट्याला येऊ नये म्हणून दुसरे लग्नही केले नाही.असे आजी नेहमी सांगायची.

तेव्हा मात्र याचे काही विशेष वाटत नसले तरी आज मात्र एक हुरहुरीचा प्रश्न मनी दाटतो. पुरुषप्रधान असलेल्या आपल्या संस्कृतीत अप्पांना कधी वाटले नसेल का की आपल्याही वंशाला दिवा हवा!

किमान मुलगा व्हावा या आशेने तरी एखाद्या पुरुषाने दुसरा विवाह केला असता, पण अप्पांचा शेवटचा आधार मीच

होते.माझ्या आजारपणात कित्येकदा कडक शनिवार करताना मी त्यांना पाहिलंय. आणि पाणीही न पिता अप्पा तासनतास देवा समोर बसून राहत.मॅट्रिकमधे चांगले मार्क मिळाले म्हणून अप्पा हौसेने माझ्यासाठी सायकल घेऊन आले.

लहानपणी त्यांच्यात फक्त राग दिसायचा मात्र जशी जशी मोठी होत गेले, मला त्यांच्या वागण्यातली मायाही दिसायला लागली. त्यांच्यातला बाप दिसायला लागला.पण या सगळ्यात मी मात्र कधी त्यांच्या समोर माझ्या मनातलं काही सांगावं किंवा खल मांडायच्या गोष्टी केल्या नाहीत. म्हणूनच की काय प्रत्येक गोष्टीत आप्पा काय प्रतिक्रिया देतील या आधीच मी लटपटू लागे!! अप्पा म्हणतील ती पूर्व दिशा असंच म्हणून मी आता पर्यंत जगत आले! त्या प्रकरणात कोणाला काही कळायच्या आत मी नाट्यगृहातुन बाहेर पडले. घरचा रस्ता धरून दहा पंधरा मिनिटं होऊनही मघाशी भरलेला कापरा निवळला नव्हता.

कशी तरी मी घाई घाई ने घरी पोहोचले. पळतच घर गाठलेलं पाहून आजीच्या कपाळावर आठ्या उमटल्या तिने प्रश्नार्थक नजरेने विचारलं, का ग नंदे काय झालं? बैल मागे लागल्यागत का पळत आली?

काही नाही गं आजी असचं!. दम भरलेला आवाज तिला जाणवू नये अशा बेताने मी वाक्य उच्चारले,

स्वयंपाकाच्या खोलीत जाताना मात्र अगदी सहज पाऊल टाकत निघाल्याच भासवलं, तिच्या नजरेआड होत दीर्घ श्वास घेत मोठा पाण्याचा तांब्या पोटात रिचवला.मनात म्हंटलं पळाले नसते तर खरंच बैल मागे लागला असता!

दुपारी कंटाळा आला म्हणून पुन्हा रेडिओ सुरू केला,

***काही दूर जब दिन ढल जाये सांज की दुलहन***

***बदन चुराये .***

***चुपके से आये..***

BA च्या पहिल्या वर्गाचा अभ्यास घोकून आता मला कंटाळा आला होता, अभ्यासात मी फारच चांगली जरी नसले तरीही, उत्तम विद्यार्थी होते. गुणही चांगले मिळत. म्हणून की काय आता पर्यंत अप्पा माझ्या लग्नाचं फारसं मनावर घेत नव्हते! पण आता मात्र त्यांच्या मनात वेगळ गणित घोळायला लागलं होतं.

संध्याकाळी समोरचं दार वाजलं अप्पा आल्याच लक्षात येताच पुन्हा तसेच धडकी भरल्यासारखं वाटलं. अप्पांच्या स्वभावाला काही औषध नाही माहीत असल्याने माझी भलतीच तारांबळ उडाली होती.

नशिबाने आप्पांनी मला पाहिलं नसावं! कारण ते तसं काही बोलले नाहीत. जर पाहिलं असतं तर आल्या आल्या त्यांनी विचारलंच असतं. मी सुटकेचा निःश्वास टाकला . जेवायला पाटावर बसून मी पान वाढायची वाट पाहत ते बसले होते!

नंदे.!! तू सकाळी बालगंधर्वला गेली होतीस? त्यांच्या आवाजात प्रश्नार्थक भाव दिसला.

अ.! अनपेक्षित प्रश्नाने मी भयंकर गोंधळले, त्यांना भाजी वाढताना थार्थरणार माझा हात स्थिर ठरवताना मला किती कष्ट घ्यावे लागले असतील माझं मलाच माहीत. काय बोलावं काही सुचेना. काही वेळ शांतता पासरली. अ.. मी?

आप्पां जेवणाचा घास उचलत म्हणाले.. होय की तेच म्हणतो तू कशी तू तर कॉलेजात गेली होतीस ना!!

अगं. दामोदर म्हणत होता, आपल्या नंदा सारखी एक मुलगी पहिली म्हणून . तेव्हा तुला विचारावं म्हंटलं! जेवण करताना अप्पा फारसे बोलत नसत. आणि नेहमी सारखा राकट स्वर आज जाणवला नाही याने काहीसं हायसं वाटलं. त्याला तेच म्हणालो मी. शक्य नाही! आमची शिवनंदा अशी कुठे न सांगता जायची नाही! बरोबर बोलताना? अप्पांच घास घेता घेता चालेलं संभाषण माझ्या कानावरून जात होत।।। वाक्य उच्चारताना माझ्यावर त्यांनी

भलताच आत्मविश्वास दर्शवला होता. या गोष्टीबद्दल मात्र त्यांनी मला पुढे काही विचारले नाही!! मी ती नव्हेच असे त्यांनी गृहीत धरले असावे! मारुतीचीच कृपा.

बरं का नंदे उद्या काही कॉलेजात जाऊ नकोस. ।

दुपारी पाहुणे येणार आहेत.उद्या पुरण पोळीचा स्वयंपाक कर! आणि हो ठेवणीतली साडी घाल एखादी बरं का!! असं म्हणत अप्पा मोठा ढेकर देत पानाला नमस्कार करून उठले.. आणि धिम्या चालीनं पाराकडे निघाले!

पाहुणे येनार!!

या कल्पनेने मी शहारले! पाहुणे?

म्हणजे माझं लग्न ठरवायचं काम चालू आहे की काय!

एक दिवसही वेळ येणारच याची कल्पना होतीच म्हणून की काय मी फार काही विचार केला नाही.आज मात्र अंथरुणावर पडून मी भविष्याची स्वप्न रंगविण्याचा भोळा प्रयत्न करून पाहिला. गोंधळलेल्या मनाला आता लाज, काळजी, नवी हुरहूर आणि नव्या प्रवासाची चाहूल लागायला लागली होती! "माझ्या परिकथेतला राजकुमार नक्की कसा असेल या बद्दल अजून तरी माझे दुमतच होते"! आप्पांनी माझ्यासाठी नक्कीच साजेसा मुलगा पहिला असेल याची खात्री होतीच पण..

सर्व अलबेल असेल का? या आगंतुक सवालाने मन काहीसं ढवळून निघाले! त्या संध्याकाळी पुन्हा एकदा मनात अनेक विषयांची सरबत्ती लागली. अप्पांना तर नट-नटी बद्दल भयंकर द्वेष असे. मग चक्क अप्पा नाट्यगृहात दिसले या गोष्टीवर विश्वास ठेवायला मला वाजवी पेक्षा जास्त वेळ गेला. जरी प्रत्यक्ष स्वतःच्या डोळयांनी पाहिले असले तरी.उद्या माझं लग्न होऊन मी सासरी जाईल हा विचार जेव्हा स्पर्शून जाई तेव्हा घरच्या विचारानं मन कासावीस होई आपण लग्न करून सासरी जाऊ हा तारुण्यसुलभ विचार धूसर होई. मग आपण अप्पांच्या सेवेत इथेच राहू आणि त्यांची काळजी घेऊ असा माझा निश्चय होई. पण कदाचित हेही माझे मनातले मनातच राहील की काय अशी मला शंका यायला लागली.

डोळा लागणारच की ओसरीतील झोपलेल्या आजीच्या खोकायच्या आवाजाने घर दणाणलं. आई!! काय झालं? अप्पांनी घाईने आजीच्या बीछान्याकडे झेप घेतली.नंदे पाणी आण गं!! अप्पांच्या घाबरल्या आवाजाने मी काहीशी दचकले. थोडा वेळ औषधपाणी दिल्यावर तिला बरं वाटलं. औषधाने तिला गाढ झोप लागली असावी। अप्पा मात्र मध्यरात्री पर्यंत जागे होते. आजीला हल्ली मधेच कधीही खोकल्याची उबळ येई. वयोमानाने हल्ली ती औषधांना प्रतिसाद देईनशी झाली आहे. ना जेवण झेपते ना औषध.

ती मात्र रात्र रात्र अढ्याला डोळे लावून पडलेली असते.मीही हल्ली कॉलेजला जाणे बंद केलं आहे.

घरी कोणीतरी हवं म्हणून तसं आप्पांनीच मला सुचवलं. अधून मधून मला कॉलेजमध्ये जायची परवानगी मिळे, पण त्यासाठी एकदोन दिवस आजीला बरं वाटलं तर बाहेर जायला मोकळीक असे.

मीही घरीच अभ्यास करून आजीची काळजी घ्यालायला लागले .. त्या दिवशी पाहुणे येणार म्हणून आप्पांनी तो कार्यक्रम त्यांच्या साप्ताहिक सुट्टी मधेच योजिला होता, सकाळी उठून मी अंगण आणि घर स्वच्छ झाडून झटकून घेतलं. कालच अंगणात सडा टाकून अंगण अरश्यासारखं चकचकीत करून ठेवलं होत, आईनं हौसेने लावलेल्या पारिजातकाच्या झाडाला आता मोहोर चढला होता. मातीच्या आडोशाला बसून नवी तुळस टुमदार बहरली होती, सोबत अंगणातल्या हिरव्यागार फुलांनी सुगंध जनू मंद वाहणाऱ्या वाऱ्याशी हितगुज करून पेरून टाकला होता, सूर्यनारायण हळूहळू आपली सोनेरी किरणे विस्तारित होते, तेव्हा कोवळ्या पिवळ्या उन्हात ते अंगण कस खुलून गेलं होतं, त्या नवी पालवी फुटलेल्या पारिजातकासारखं.

अंगणातली चाफ्याची फुल सुद्धा आज आपला नवा साज चढवून जणू एखादी प्रियसी आपल्या प्रियाची वाट पाहत बसावी तशी बसली होती. आपल्याच तोऱ्यात. मंद वाऱ्या बरोबर ती अशी मोहक डुलत होती जणू आता रुसने लडिवाळ रागावणे या खेळाला खरी रंगत आल्यावर प्रिया ज्या मादकतेने आपल्या प्रियकराला क्षण क्षण घायाळ करत असते अगदी त्याच थाटात.त्यात सुंदर मोगरा आपल्याच नादात बहरला होता, नुकताच यौवनाच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवलेला गुलाब, आणि जुन्याच डोलाऱ्यात आपल्या नवीन अनुजांना सुंदरतेची धडे देणारी जास्वंद. लाल गुलाबी रंगाने न्हाऊन निघाली होती.ती सकाळ प्रसन्न करणारी होती.आज अप्पांच्या नव्या सदऱ्याला मी विस्तवाच्या इस्त्री वर छान कडक इस्त्री करून दिली. सोबत आईच्या ठेवणीतल्या माझ्या एका आवडत्या साडीलाही छान इस्त्री करून तिच घालावी असं मनाशी ठरवून टाकलं. प्रकार तर जुना होता पण माहित नाही मला ती साडी फार फार आवडायची. आजीनेही आपली ठेवणीतली साडी नेसली. आतल्या खोलीत आरशात स्वतःला नेहळताना असताना नकळत मनात लाज दाटली.. बाहेर पाहुण्यांची लगबग ऐकायला आली.

अगं . शिवनंदा!! पाहुण्यांसाठी पाणी आणते का गं!! म्हणून आप्पांची हाक आली आणि मी पुन्हा एकदा शहारले! थरथरत्या

हातानेच पाणी समोर नेऊन एकऐकाला देत पुढे सरकू लागले.पण वर बघायची हिम्मत काही होईना.लगबगीनं मागे होत आत पळाले! लाजेने काही सुचायला वाव नव्हता.

काही वेळाने जेवणाचा कार्यक्रम उरकून मंडळी बैठकीला बसली.जेवणाची पंगत बसली तेव्हा माझी उडालेली तारांबळ त्यांच्या लक्षात आली असावी.

"मुलगी सावळी आहे जराशी"! कोणीतरी आपण जणू सुंदरतेचा पुतळाच आहोत अशा थाटात माझ्यात खोट काढली. ते ऐकून अप्पाच्या चेहऱ्यावरच हसू काहीसं मावळलं. पण असो आमच्या श्रीधरला मुलगी पसंत आहे. तुमचं काय ते सांगा! त्यातल्या एका कर्त्या पुढाऱ्यांनी पुढाकार घेत पान खाऊन लाल झालेल्या मुखाने होकार कळवला. तसं अप्पांच्या चेहऱ्यावर हरवलेले हसू पुन्हा झळकू लागलं.

भलामोठा पानाचा तुकडा तोंडात टाकल्याने त्या कर्त्यापुढाऱ्याच्या तोंडात लाल रसाला पूर आला होता., उ उ करत कुठे थुंकवे असे त्याने विचारले. अप्पांनी चटकन पिंकदान त्यांच्या समोर करत त्यांच्या पिचकारील मोकळी वाट करून दिली.दाराच्या फटीतून मी बाहेरच्या गोधळाचा अंदाज घ्यायचा प्रयत्न माझाही काहीसा फोल ठरला होता! एवढ्या वेळा समोर जाऊनही मी

नवऱ्यामुलाला पहिलेच नव्हते. तसं ओझरते दर्शन बाहेर जाताना झाले. कोट पॅन्ट, आणि बूट असा थाट करून साहेब आले होते. डोळ्यावर गोलभिंगाचा चष्मा लावून हाताच्या बाह्य मागे सारून बसलेला तो भावी नवरदेव काहीसा अमिताभचा चाहता असल्या सारखा वाटला, उंचीही तशीच मात्र मुश्किलीने पाच फूट असलेली मी, स्वतःला त्याच्या उंचीशी जुळवून पाहु लागले पण माझं गणित काही जुळेना, माझी अप्पांच्या नकळत घेतलेली उंचटाचाची चप्पल जरी हिशोबात घेतली तरी मी त्याच्या खांद्यापर्यन्त तरी पोहचेल का याची जरा शंका वाटली.

पण तो काही त्याचा रोजचा पोशाख नसावा. आज उगाच मुलगी पाहायला जायचे म्हणून केलेला तो थाट, त्यात वावरताना झालेली त्याची तारांबळ, आणि अवघडलेलं अंग मला पाहताच जाणवलं!

असो पण तसा बरा वाटला. त्यांनी मुलीला मुलगा पसंत आहे का असे विचारले, तेही का तर तशी विचारायची पद्धत असते म्हणूनच!

आप्पांनीही हसतमुखाने होकर कळवुन दिला. काही देण्या-घेण्याच्या गोष्टी करून झाल्यावर लग्नाची सुपारी फुटली. संध्याकाळी अप्पा मोठ्या उत्साहाने आजीशी बोलत होते. फार

गुणी आहेत हो श्रीधरराव! वडिलांचा शब्द खाली पडू देत नाहीत! बरं का आई! "नाशिबच काढलं म्हणायचं आपल्या शिवनंदाने ". मुलगा चांगल्या कंपनीत कामाला आहे शिवाय उत्तम पगार आणि शेतीवाडीही बक्कळ आहे. माणसं खूपच भले वाटले उत्तम स्थळ मिळालं नंदासाठी.! आप्पा आता भलतेच खुश होते. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानचं हसू झळकू लागलं होतं! माझं लग्न म्हणजे एका मोठ्या जबादारी मधून सुटणे असा त्याचा अर्थ होता. माझ्या माघारी अप्पांची काळजी कोण घेईल या कल्पनेनं मन ओशाळून जाई. पण दुसऱ्या बाजूने आपल्यामुळे आपली तरणीताठी पोर लग्नावाचून घरात राहिली तर त्यांच्या मनाला जी हुरहूर राहील आणि त्यातच झुरून त्यांचा अंत होईल अशीही कल्पना मनात घर करून बसे ..

बरं का आई! यंदा च्या कार्तिकात मुहूर्त आहे. तर उरकून टाकू दिवाळी झाल्यावर. माजघराच्या उंबऱ्याशी बसलेले अप्पा अडकित्त्याने सुपारी काटत, आजीच्या कानावर जाईल अशा बेतानं गोष्टी करत बसले होते. दोनतीन महिने आहेत अजून तर सगळी तयारीही करता येईल. श्रीधर रावांनी जास्त काही मागितलेही नाही. फक्त सोन्याची दोन तोळयांची चैन आणि एक स्कुटर देऊ असे

काबुल केले आहे आपण.आणि तसही आपली पडली मुलीकडली बाजू लग्न काढून द्यायचे असे ठरले आहे! सगळं नीट पार पडावं हीच प्रार्थना मारुतीराया कडं.! शेवटचं वाक्य उच्चारताना सोडलेला दीर्घ श्वास वातावरणात विरला.

होईल सगळं नीट मारुतीरायाच्या कृपेनं!! उंबऱ्याशी टेकून बसलेलं अप्पा मनावर विचारांची चादर ओढत काही वेळ तिथेच विसावले! अप्पा आजीला या गोष्टी सांगत तेव्हा मी कान पाडून ऐकून घेई! या गोष्टींमध्ये माझं मत घेण्याची तसदी सहसा कोणी घेत नसत! त्यामुळे मध्ये बोलायचं तर प्रश्नच नव्हता.

त्या दिवशी झोपायला जाताना अप्पा पुन्हा एकदा म्हणाले. बरं का नंदा.!! आज त्या शालू मध्ये अगदी तुझ्या आईसारखीच दिसत होती बरं!

क्षणभर मला वाटले की तुझी आईच आली तुला आर्शिवाद द्यायला! गुणी आहेस बाळ! .. तू सासरी गेल्यावर आमचे कसे होणार!! अप्पांच्या डोळयात आनंद आणि दुःखाची तीच संमिश्र छटा दिसली, जी मी रोज अनुभवत होते. यांबद्दल फारसा विचार नको म्हणून त्यांनी विषय बदलला, इकडच्या तिकडच्या हास्य विनोदाने विषय बदलून जरी पाहिला तरी, त्यांच्या चेहऱ्यावरची ती

काळजी मात्र नेमकी दिसून येई. नाही म्हणता माझ्या मनात असलेलं मी बोलणारच होते तेच आप्पांनी ते ओळखलं.

असो झोपा आता नंदा बाई! आणि आता तुम्ही सासरी जाणार तेव्हा माहेरी मन गुंतवून कसे चालणार! असे म्हणत आप्पांनी दिवा मालवला. त्यांचा घोरण्याचा सूर येई पर्यंत मी जागीच होते!

माझा स्वभाव फार अबोल! आणि घाबरट वृत्तीची असल्याने मला कधीच माझं मत कोणासमोर मांडता आलं नाही! निदान या वेळी तरी बोलावे असे ठरवले होते, । पण " छे "!!, झटकन मानत येईल ते करून बसेल ती नंदा कुठली. अप्पांच्या भाषेत खरंच अप्पांचा स्पष्टवक्तेपणा घेतला असता तर खूप बरं झालं असत. आजी आणि अप्पा दोघे जणू लग्न ठरले या आनंदात वेडे झाले होते! मी अशा वेळी काहीतरी वेडंवाकडं बोलले तर नक्कीच अप्पांचा लहानपणी पहिला तसा रुद्राचा अवतार बाहेर येतो की काय असे वाटायचे. तसही माझ्या मताला फारसे काही विचारात घेतले जात नव्हतेच.

## माधवायन.

आप्पांनी माझ्यासाठी इच्छित स्थळ शोधून सर्व गोष्टी ठरवून आता एक आठवडा झाला होता, जवळच्या नातेवाईकांना पत्राद्वारेही बातमी कळवली गेली! एक अख्खा दिवस आप्पांनी पत्र लिहिण्यात घालवला! ठरलेला एक मजकूर आणि फक्त त्यात ची. टिम्बटिम्बला अनेक आशीर्वाद. लहानग्या टिम्ब टिम्बला खूप प्रेम काळावे, इकडे सर्व कुशल आहे अश्या मजकुराचे अनके पत्र तयार केली. मामा, काका, मावशी, मित्रमंडळी, आणि सगळे दूर दूर पर्यन्तच्या नातलगांना आमंत्रणे पाठवली गेली होती.

मला आप्पांनी शेवटचे म्हणून सगळी पत्रं डोळ्याखालून घालायला लावली.त्यात फार काही नाही, थोडा फार बदल करून शेवटी अप्पांनी ती पत्रे पोस्टात नेऊन टाकली! ।त्यावर चार पाच दिवसातच अप्पांच्या नावाने एक पत्र आलं! पत्र जरी दुपारी आलेले असले तरी तरी मी ते उघडून पाहिले नाही! अप्पांच्या नावाच्या कुठल्याच गोष्टीत मी लुडबुड करत नसे. संध्याकाळी अप्पा घरी आले तेव्हा त्यांनी पत्र उघडून छान लयबद्ध रित्या वाचून काढले!

***प्रिय, मुकुंदा..***

*तुझे पत्र मिळाले. कुमारी शिवनंदाचे लग्न ठरल्याची वार्ता कळली, आंनद झाला. यंदा माधव*

*पदव्युत्तर परीक्षा पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला, पुण्यास कामावर रुजू होण्याचे पत्र मिळाल्याने त्याला पुण्यात पाठवावे म्हणतो. राहण्याची सोय नाही! तुझ्याकडे काही व्यवस्था होत असेल तर लवकरात लवकर कळवावे. तिथे लग्नघरी तयारीसाठी*ही *तुझी धावपळ होईल म्हणून मदत म्हणून तो कामा येईल या विचाराने सुचवले! बाकी कोल्हापूरला सर्व कुशल आहे, कुमारी शिवनंदाला अनेक आशीर्वाद, मातोश्रींना दंडवत.*

*कळावे,*

*आपला*

*गिरिधर पाटील*

कोल्हापूरच्या गिरिधर काकांच पत्र होत, काका अप्पांचे जुने दोस्त, अगदी जिगरी दोस्त असल्याने काहीही अडचण असली तरी अप्पा सगळयात आधी गिरिधर काकाचाच सल्ला घ्यायचे! काका अनेकदा घरी आलेले आठवतात. माझ्यासाठी रामा काकू फराळ पाठवीत असत, तोंडात टाकताच विरघळतील अशा खमंग खोबऱ्याच्या वड्या, माझ्या आवडीचे बेसनाचे लाडू, आणि चकल्या तर हमखास

असायच्या! त्यांचा मुलगा माधव फार लहानपणी भेटल्याचा आठवतो! चिडका, हेकेखोर आणि हट्टी असा स्वभाव होता त्याचा.

आमचे एकमेकांशी फारसं पटायचं नाही!

एक दिवस संध्याकाळी तासभर माझी अंगणातल्या बागेत उठाठेव चालू होती,ही कुंडी उचल तिकडे ठेव ती कुंडी उचल इकडे ठेव, बराच वेळ घालवून अंगणात उगलेलं बारीक बारीक गवत खुरपणी करून काढून टाकलं. अंगण स्वच्छ दिसायला लागलं..

वरचा माळा आम्ही राहण्यासाठी वापरत असू, खालच्या माळ्यावर जास्त काही नाही काही घरातलं समान ठेवलेलं होत, तरी तेही मी अप्पाच्या सांगण्यावरून घासून पुसून स्वच्छ करून घेतले. खालच्या खोल्याही राहण्या योग्य झाल्या होत्या, त्या कोना भाडेकरूला देऊन टाका असं मी एकदा अप्पांना सुचवलं, तेव्हा ते म्हणाले "बरे हा नंदा बाई! तुमचे लग्नकार्य एकदा उरकले की आम्हांला नवीन भाडेकरू सोबतीसाठी ठेऊ! तूर्तास तरी नको"!! सांगितलेलं लगेच ऐकतील तर ते आमचे अप्पा कसले. मी लहानपणापासून अप्पांना पाहत आले, त्यांचा हट्टी स्वभाव सर्वांना ठाऊक होता.!! एक गिरिधर काका सोडले तर कोणी अप्पांची

कानउघाडणी करायचं धाडस दाखवत नसे. संध्याकाळच्या वेळी झाड पानांचा मंद सुवास दरवळायला लागला होता. आपल्याच नादात डुलणारी ती पानं फुलं मोहक दिसत होती, त्यांना मोकळा वारा प्यायला उसंत मिळाली होती. काहीवेळानं पाठमोरी उभी असलेली पुसटशी आकृती माझ्या डोळयांच्या कडांनी टिपली, मघापासून झाडाफुलांत रमलेल्या हस्तकांना काहीशी उसंत देत, मातीमाखल्या हातानंच केसांना मागे घेऊन मी फाटकावर ओझरती नजर फिरवली. एक पंचवीशीतला तरुण उभा असलेला दिसला. कोण? मी प्रश्नार्थक नजरेने विचारलं. ओळख न पटल्याने कपाळावर आठयांच जाळं पसरलं.

उन्हात फिरून घामेजलेला चेहरा एका हाताने पुसत त्याने पाण्यावाचून कोरडलेल्या ओठांवर जीभ फिरवली. फाटका समोरच्या वास्तूकडे काहीश्या साशंक नजरेने पाहत असताना तो गोंधळला असावा.

अ!! नमस्कार ॥ मी माधव गिरिधर पाटील!! एका दमात घोकल्यागत उच्चारलेले त्याचं वाक्य, अगदी वर्गात मास्तरांनी एखाद्या शेम्बड्या पोराच्या पार्श्वभागावर वेताच्या छडीचा प्रसाद देऊन त्याच्याकडे नावाची विचारणा केल्यावर ते पोर जसा प्रतिसाद येईल तसंच वाटलं." अरे आलात का तुम्ही"?

या आत या अप्पा तुमचीच वाट पाहत होते. मीही ओळखीचं हसू हसल्यानं त्याला काहीस हायसं वाटलं असावं. त्याच्या मुखावर इच्छित स्थळी पोहोचल्याचं समाधान पसरलं. हातात एक ट्रंक, पांढरेशुभ्र धोतर अंगावर काळा कोट, आणि चालताना कर्रर्र कर्रर्र आवाज करणारी अस्सल कोल्हापूरी चप्पल, भरदार चालीचा पैलवान तसा मोहक वाटत होता. सुटाच्या आतूनही बिनदिक्कत डोकावणारी पैलवानकी दिसून येत होती. घामेजलेला अवतार आणि डोक्यावरच्या कुरळ्या केसांचा विस्कळीतपणा वरून प्रवासाची दगदग लक्षात येत होती. नुकत्याच फुटलेल्या मिसरूडाला देखील रेखीवपणा आलेला असल्याने,

मला लहानपणीचा मरकुडा बुटका माधव आठवून दोघांची तुलना करता येईना! पायऱ्या चढून वर जाणाऱ्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत मी विचारात हरवले. ये ये माधवा तुझीच वाट पाहत होतो!. अरे किती मोठा झालास!

अप्पांच्या चेहऱ्यावर बऱ्याच दिवसांनी मोलाची वस्तू गवसल्याचा आनंद दिसला. प्रवासात काही त्रास तर नाही झाला ना माधवा.! नाही अप्पा रस्त्यात भेटलेला पाकीटमार, आणि पत्ता शोधताना टळलेली दुपार एवढे सोडता, काही त्रास नाही बघा. माधव हात पाय धुताना गमतीने म्हणाला, पाठोपाठ अप्पा हसून

मस्करी करत म्हणाले म्हणजे पुणेकरांनी आम्ही पाहुण्यांची आम्ही किती निष्ठेनं काळजी घेतो याच दर्शन येताच दिलं म्हणायचं! अप्पांच्या हास्य विनोदाने घर दणाणून निघालं. आप्पा आजी पाया पडतो. असे म्हणत पाया पडण्यासाठी माधव वाकला, अप्पांनी गमतीने त्याच्या पाठीत घातलेला धपाटा खाऊन, मुठीएव्हढा लाडू एका दमात तोंडात कोंबल्यावर मोठ्या कष्टानं तो घशाखाली उतरवताना जसे भाव दिसतील अगदी तस्सेच काहीसे त्याच्या तोंडावर पसरले.

आजीच्या प्रश्नांची सगळी उत्तरे मात्र त्याला त्याच्या गावभाषेत द्यायला त्याला आंनद वाटत असे की ते त्याचं भाषेविषयीच प्रेम होत ते काही लक्षात येईना, मात्र तो बोलीने आणि भाषेतील वैविध्याने परिपूर्ण होता याचा प्रत्यय आला. त्याच्या बोलण्यातुन कधी कोल्हापुरी बाणा दिसून येई तर कधी प्रमाण भाषा! माजघरातून दोघांचा हास्यविनोद ऐकत मी दारात उभी होते.तुला सांगतो माधवा तुझा बाप एकदा पुण्याला आला इथे येण्याची पहिलीच वेळ होती त्याची. सकाळी आला तो संध्याकाळी इथे पोहोचला, त्या दिवशी पासून त्याला पुण्याची भारी चीड, अरे हे पुणेकर म्हणजे महाविचित्र प्राणी कसे रस्ता चुकवुन देतात हे त्याने आल्यावर सांगितलं. " पुन्हा मात्र काधी कोणाला रस्ता विचारला नसेल त्याने " अप्पा पुन्हा एकदा

गडगडाटी हसत त्याच्या दंडावर चटकन थाप मारत म्हणाले. असे चारदोन जोरदार चापटी ओढल्या की संभाषण खुलते असा काहीसा त्यांच्या समज असावा! खुलते म्हणण्यापेक्षा मालवते असे म्हंटले तर उत्तम म्हणता येईल. त्यांचा तो लाडिक मार फारसा कोणाला भावत नसे, त्यानेच की काय पुढचा त्रयस्थ व्यक्ती तिथून निसटण्यात धन्यता मानत असे.

हा पठ्ठ्या मात्र अजून तग धरून बसून होता याचे जरा नवल वाटले. तिथे बसताना आपल्यावर असे धम्मकलाडू फुटणार आहेत याची त्याला कल्पना नसावी, आणि नंतर ती आलीच तरी आता आपल्याकडे काही पर्याय नाही या हिशोबाने त्याला बसणे भाग होते. अप्पांची आपुलकीची विचारपूस आणि त्यांचे लहानपणीचे इतिहासजमा झालेले किस्से रंगून सांगताना अप्पांचा चेहरा आठवणींच्या उजाळयानं भरून आलेला पाहून त्याला ती मैफिल मोडावी असं वाटेना. तरीच कसं बसं त्यानं त्याच्या पैलवानकीच्या जोरावर निभावुन नेले. फार दिवसांनी अप्पांना असं खळखळून हसताना बघत होते! तेव्हा क्षणभर मनात विचार येऊन गेला, असं थाटात गप्पा मारत अप्पांसमोर मी कधी बसले आहे?!! मी विचारात हरवलेली उंबर्यात उभी असलेली मी. विचारांत हरवून गेले होते. आप्पांनी मला डोळयांच्या कडांतून टिपलं.

बाळा शिवनंदा, "माधव शी बोलली का"?

माधवाही आपली शिवनंदा, लहानपणी तुम्ही दोघे फार उच्छाद मांडायचे हो! माधवने मारले म्हणून नंदा बिचारी मुसमुसून रडायची. मग तिला खोबऱ्याची वडी देऊन गिरिधर तिची समजूत काढायचा.!

लहानाचे कधी एवढे मोठे झालात कळले सुद्धा नाही! दोघे गप्पा मारत बाहेर बसले होते.रात्री जेवणात वांग्याचं भरीत आणि वालाची झणझणीत आमटी केली होती! अप्पा! "नंदा मात्र अन्नपूर्णा आहे हा ". असं म्हणत माधवने देखील तृप्तीचा ढेकर दिला. फार समाधान वाटलं.दुसऱ्या दिवशी सकाळची गोष्ट, भल्या पहाटे अप्पा उठून देवपूजा करत,

अंघोळीसाठी पाणी गरम झाले आहे सांगायला मी मधवाच्या खोलीत गेले अप्पांच्या शेजारी घातलेला त्याचा बिछाना रिकामा होता.तो अंगणात जोरबैठका मारत व्यायाम करून आत आला, स्नानादी उरकून अप्पांसोबत देवपूजा करून बाहेर जाण्यासाठी तयार झाला तेव्हा कालच माधव आणि आजचा माधव यात फरक कळेना!. काल धोतर पंचा घालून गावचे प्रतिनिधित्व करणारे पैलवान, आज अगदी सूट पॅन्ट. कोल्हापूरीच्या जागी चकाचक पॉलिश केलेले बूट घालून साहेब तयार झाले होते! आप्पा त्याला

पाहून काहीवेळा चकित झाले.काय रे माधवा काल तर धोतर पंचा घालून होतास आज आणि आज सुटबुट कसे?! माधव गालात हसला! आणि केसांवरून हात फिरवत म्हणाला.

" अप्पा काल कोल्हापूरचा होतो, आज पुण्याचा झालो! शेवटी माणसाने कसं पाण्यासारख असावं, जिथे जाईल तिथल्या सारखं! हे मात्र बरोबर बोलास हा माधवा! खाटेवर बसलेल्या आजीने संभाषण नेमके टिपले. तसे तिघे पुन्हा एकदा खळखळून हसले.

माधव म्हणजे निखळ वाहणारा झरा होता. अखंड वाऱ्यावर उडणारा पतंग होता, वारा येईल तसे स्वागताला झोकून देणे एवढेच त्याचे काम. त्याचबरोबर

अखंड बडबड, आजीशी त्याच खास पटायचं, आजीला कोल्हापूरच्या गमती जमती सांगून दोघे मोठ्या मोठ्या ने हास्यविनोद करत! त्याच्या अवखळ विनोदाने घर दणाणून जाई. कित्येक दिवसांनी का होईना घरात नवं चैतन्य आल्या सारखं वाटे! उत्तम गुण मिळवून त्यानं, पुण्यात नुकत्याच चालू झालेल्या मॉडर्न कॉलेजात प्राध्याकाची नोकरी धरली, तो स्वतः एक उत्तम शिक्षक होता. हे त्याच्या बोण्यातूनच आपसूक जाणवायचे आपला विषय नेमक्या उदाहरणाने उत्तम रित्या तो पटवून द्यायला भलताच हुशार

होता.अप्पा आणि आजी यांना तर त्याने आल्या आल्याच गुंडाळले होते! हल्ली आजी आणि अप्पांचा अगं ये नंदा!. या हाके ऐवजी अरे ये माधवा असा आवाज जास्त कानी यायला लागला!

का माहीत नाही पण नकळत माझ्या मनात नवीन इर्षा जन्म घेऊ लागली होती की काय पण मला आता त्याच्या या लोकप्रियतेचा राग यायला लागला होता.

मूळची मी अबोल फारशी काही बोलायची नाही, मात्र माझ्याशी आजी अप्पांचे चाललेले ऐकतर्फी संभाषणही आता होईनासे झालं तेव्हा मात्र मला एकटे वाटायला लागलं. आता कॉलेजात जाणे तर बंदचा झाल्यात जमा होते. आप्पा आणि माधव दोघे सकाळी कामावर गेल्यावर मी आणि आजी दोघीच घरी असू.

गाणे ऐकत मी दुपार घालवी, नाटकाचे काय झाले असेल! पुढच्या महिन्यात नाट्यसंमेलन असते आता नाटकाच्या तालमीला सुरवात झाली असेल नाही! मी स्वताशीच घोकत बडबडत गाणे ऐकण्यात मग्न झाले. दुपारभर या ना त्या कामात मी स्वतःला गुंतवणूक घेई. माझं लग्न झाल्यावर आजीची काळजी कोण घेईल म्हणून मनाला हुरहूर वाटत असे..

आजीला एकदा मनातील काळजी बोलून दाखवली तर ती उलट माझ्यावरच डाफरली.. आता लग्न मोडायचा गोष्टी करू नको

बरं भरल्या घरात! तिनं चिडून उच्चरलेल वाक्य कानात घुमले. माधव सारखा एखादा मुलगा असता मुकुंदाला तर किती बरे झाले असते, निदान जीवाला आधार तरी असता! हे अनेकदा ऐकून आता मला त्याबद्दल फारसे काही वाटनासं झालं, एक गोष्ट मात्र जमेची होती, माझे सासरही पुण्याचेच होते, फार लांब नाही पण पिंपरीत मध्ये त्यांचं साध्याच बिर्हाड होत! निदान मला त्यांना बघायला तरी येता येईलही आशा! हल्ली कसल्याशा स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करायचा म्हणून मधवाने माझ्याकडून खालच्या घराची किल्ली मागून घेतली. दोन तीन दिवस तिकडे राहिला असेल.

दुसऱ्या दिवशी दुपारी दार वाजलं, माधव दारातुन पाय ओढत आत आला! पायाला भली मोठी जखम झाली होती, त्यातून बरच रक्तही वाहत होत. ॥ त्याचं ते रक्ताळलेला अवतार पाहून क्षणभर तोंडून शब्द फुटेना झाले. तोंडातून किंकाळी बाहेर पडली, अरे देवा! माधव. हे काय झाले! किंकाळी घरभर दुमदुमली. दुपारच्या वेळी अण्णाही घरी नव्हते, आता काय करू या विचाराने मी थरथरले. आजीचा जीवही घाबरा झाला. काय झालं? म्हणून तिनं घर डोक्यावर घेतले. " काही नाही आजी तीन चाकाच्या रिक्षा मध्ये बसलो होतो, ती दुसऱ्या गाडीला धडकली, रस्त्यावर पडलो त्यामुळे पायाला थोडी दुखापत झाली! होईल ठीक नका काळजी

करू" . माधव चेहऱ्यावरच्या त्या तीव्र वेदना लपवत आजीला शांत राहण्याची खून करत म्हणाला. पायातल्या जखमेपासून निघणारी वेदना सरळ डोक्यात जाऊन जेव्हा भिडते तेव्हा चेहऱ्यावर दिसणारे भाव स्पष्ट दिसत असतानाही माझा राडावलेला चेहरा पाहून तो उसनं अवसान आणत हसला! जसे काहीच झाले नाही असे त्याला भासवायचं होतं. मी घरगुती पद्धतीनं जखमेला जमेल तशी मलमपट्टी करून पहिली पण रक्त मात्र बराच वेळ थांबायचं नाव घेईना।। मला चिंता वाटायला लागली असतानाच अप्पांच्या येण्याची चाहूल लागली. जीव भांड्यात पडल्या सारखं वाटलं.

अप्पांनी डॉक्टरांना बोलावून आणले!

डॉक्टरांनी गोळया औषध देऊन आठ दहा दिवसांत जखम बारी होईल असं सांगितलं.

आता माझ्या कामात सेवेसाठी अजून एका रुग्णाची भर पडली .आज मात्र घरात शांतता पसरली होती, रोज बडबड करून माधव घर दनानुन सोडत असे, आज मात्र त्याचा वेदना सहन करून कोमेजलेला चेहरा नजरेतून सुटत नव्हता. शांत निश्चल पडलेला माधव पाहून माझं मन कासावीस झालं होत. बरंच रक्त वाहून गेल्याने आज त्याच्या चेहऱ्यावर नेहमी सारखं तेज दिसत नव्हतं!

त्याचा वेदनेने झाकोळलेला चेहरा पाहून मला राहवेना. काय करू त्याला बरं वाटावं म्हणून? जेवण! अरे हा जेवण बनवते मस्त गरम गरम त्याला भूक लागली असेल. कल्पनेनं माझा चेहरा खुलला. त्याच्यासाठी गरम गरम जेवण बनवून त्याला खाऊ घातलं! तो शांततेत निजला मात्र अप्पा काहीसे अस्वस्थ होऊन खोलीत येरझारा घालत होते! बऱ्याच उशिरा त्यांच्या खोलीतला दिवा मालवला. सकाळी उशिरा आप्पांनी पत्र लिहायला घेतले, माधवा!! तुझ्या अपघाता बद्दल कोल्हापुरात कळवतो म्हंटलं. . असे म्हणत अप्पा त्यांच्या छोटेखानी टेबलावर बसून पत्र लिहिण्याची तयारी करू लागलेच होते, तोच माधव त्यांना थांबवत बसल्या जागेवरून ओरडला. "नको अप्पा " कशाला उगाच! आठवडा भारात होईल बरं कशाला उगाच त्यांच्या जीवाला घोर लावंताय, आई उगाच घोर लावून बसंल काळजाला! तिला काळजी वाटत राहील सारखीच आठवडा भरात तसंही बरं होऊन जाईल नका कळवू काही विशेष नाही एवढं! तो समजावणीच्या स्वरात म्हणाला.

असे म्हणतोस!! तेही खरे आहे म्हणा पण उद्या त्यांना कळाल्यावर आम्हाला कळवले नाही असे व्हायला नको म्हणून बाकी काही नाही!! आप्पा हातातली लेखणी खाली ठेवत म्हणाले.मला माधवचं हे मात्र कळत नसे कधी तो अस्सल

कोल्हापुरी बोलून कोल्हापूरचा पट्ठा कसा असतो याचे उत्तम दर्शन देई, तर कधी कॉलेजातल्या प्राध्यापकांचा तोरा दाखवी, पुणेकरांनाही लाजवेल अशी मराठी बोलत असे.

अप्पांशी बऱ्याचदा साहित्यिक गप्पा होत, अप्पांचे वाचन माधव एवढे नक्कीच नव्हते मात्र जेवढे होते त्याचे विस्तृत वर्णन करून सांगणे त्यांना खूप आवडे. मी नेहमी प्रमाणे माझं काम आवरत त्यांच्या गप्पांकडे कान लावून असे. गप्पा तासनतास रंगत, कधी मी घरातलं केर कचरा साफसफाई करत माजघरात रेंगाळत असे. कधी भाज्या निवडायचे काम तर कधी आवडीचे विणकाम. त्यांच्या गप्पा ऐकायला मला आवडायचं. खांडेकरांच्या दोन मने, हिरवा चाफा, उल्का क्रौंचवध अशी जड नावेही अप्पांच्या लक्षात होती, जास्त कधी वाचली नसावीत असे वाटले मात्र माधवाला मात्र जाणवू दिले नाही! पु. ल च्या विनोदी लेखनाची मात्र त्यांना भारी मौज वाटे, अलीकडेच त्यांनी मतकरींची खेकडा वाचली होती, तुला सांगतो माधवा. उत्तम लिखाण हे लेखकाच्या मनातून लेखणीत झिरपत असते, जितका रस वाचकाला वाचतांना येतो, तितकीच गोडी लेखकालाही येत असावी, त्यातूनच कलेचे हे उत्तमोत्तम आविष्कार पहावयास मिळतात" होय की नही! आप्पा एखाद्या जाणकार सारखे पारखी असल्याचा आव आणत म्हणाले. मधवाला मात्र पुस्तक म्हणजे अतिप्रिय गोष्ट होती, कामावर रुजू

झाल्याच्या पहिल्या दिवशी पासूनच घरात नवीन नवीन पुस्तक दिसू लागली, तो दर दोन तीन दिवसांत नवीन पुस्तक आणत असे, काहीशी अबोल असलेली मी त्याच्याशीही फारशी काही बोलायची नाही. रोज कामापूरता आमचा संबंध. मात्र रोज तो बाहेर गेला की दुपारच्या वेळी त्याच्या खोलीतून मी पुस्तक चाळून काढी, हल्ली माझा वेळ फारच मजेत जाऊ लागला होता, मला कथेच्या चंदेरी दुनियेत विहारायला फार मौज वाटायची.

पण हा आंनद फार काही टिकला नाही. माधवच्या दुखापतीने अप्पांच्या काळजीत अजूनच भर घातली,

अपघात झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीची गोष्ट आठवते,

सकाळी सकाळी अप्पा आपले सर्व आटोपून आपली वडिलोपार्जित छत्री काखेला मारून कामावर निघाले,.

खाटेवर पडल्या पडल्या माधवाने मान उचलून पाहिले,

आज त्याच्या अंघोळीला सुट्टी होती. रोज कामाशी काम ठेवणारी मी आज मात्र हालचाल विचारणे गरजेचे होते.आता बरं वाटतंय का? सहज आपले काहीतरी बोलावे म्हणून मी विषय काढला.

अ.!! नाही ना. तो दुखऱ्या स्वरात म्हणाला.

मी जवळ जावून पायाकडे पाहिले.काय होतंय पुन्हा डॉक्टरांना बोलावणे पाठवायचे का! मी काळजीने विचारलं. नाही नको डॉक्टर काही भुकेचे दुखणे बरे व्हावे म्हणून गोळया देत नाही! भूक न लागण्याची औषध मिळतील त्याच्याकडे?!! मग तो म्हणेल हे दुखणे आमच्या कडे बरे केले जात नाही. मला मात्र त्याच्या गमतीशीर बोलण्याचे भारीच हसू आले.

अगं बाई जेवन तर केव्हाच करून करून ठेवले मात्र द्यायला मात्र विसरले! हे आमच्यातलं पाहिलं विनोदी संभाषण. मधवाला संगीताची भारी आवड, या बाबतीत आवड जुळली, सोबत त्याला संगीताची उत्तम जाणही होती, मग काय दुपारी रेडिओच्या तालावर आम्हीही साथ देत गाणे म्हणत असू.

एक दिवशी संध्याकाळच्या वेळी उठून तो स्वयंपाक घरात आला, कडेला एक बाजूला बसून तो पाककला न्याहळत बसला होता, काय नेहळतोस माधवा.! मी फोडणी टाकत त्याला प्रश्न टाकला. भाजीला फोडणी देताना ठसका झाला तसा तो खोखो करत खोकू लागला, फटकन शिंकुन माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याकरीता त्यानं तोंड उघडलंच होतं की फोडणीचा तोंडला पाणी आणणारा वास नाकात शिरला.

अ।।हा हा . पाककला म्हणजे उत्तम कला आहे, आणि शिवनंदा बाई तुम्ही तर जणू अन्नपूर्णाच आहात की. त्याने जणू काही पाककला येणारी मी जगातली एकमेव व्यक्ती आहे आशा प्रकारे माझं कौतुक केलं. त्याच्या चेहऱ्यावर निरागस हसू होत, फोडणीच्या वासाचा सुंगन्ध मनात साठवणारा माधव पाहून मला त्याच फार कौतुक वाटलं.

एक विचारू? तो तसाच निरागस नजरेने पाहत म्हणाला. तुम्ही मला शिकवाल का? ।

मला आवडेल शिकून घ्यायला!!

माधवाने उत्साहात विचारलेल्या त्या अनपेक्षित प्रश्नाने मी गोंधळले. कौतुकाने त्याच्याकडे पाहणाऱ्या माझ्या चेहऱ्यावर आता आश्चर्याचे भाव दिसायला लागले.

अगं बाई तुम्हाला कशासाठी शिकायचे हो! आता लग्नाचे वय झालं, बायको आली की करीलच की!

मला क्षणभर कोणी पुरुष मला स्वयंपाक शिकायचा आहे आणि मला शिकवाल का असे माझ्या जवळ म्हणत आहेही गोष्टच पटेना ऐकायला जरा नवीन होतं ना म्हणून कदाचित.चुलीजवळ जावे ते स्त्रियांनीच असा नियम जणू ब्रह्मलिखित असल्यासारखे वागणावणारी आपली संस्कृती, एखादया पुरुषांने असे काही छंद

जोपासणे म्हणजे थोडक्यात बाईल उद्योग करण्यासारखे असे आमचे अप्पा म्हणत! छे बाई. काहीतरीच काय! अप्पांना आवडणार नाही तुम्ही स्वयंपाक घरात काम केलेले! मी त्याची मागणी फेटाळून लावत उत्तर दिलं. अप्पांना सांगते कोण! त्याने डोळे मिचकावत माझ्याकडे पाहिले.

मला मात्र त्याचे भलतेच नवल वाटले. स्वयंपाक बाईने केला तर ते तीच कर्तव्य असत, आणि तेच जर पुरुषाने केलं तर ती कला . असं असत तुमचं पुरुषांच!

ते काही असो मला मोकळे बसणे आवडत नाही, आणि काहीतरी काम करत असाल तर तुमचे डोके आणि मन दोन्ही कसे व्यस्त राहते, याने नवीन गोष्टी शिकायचा आंनद मिळतो. ते काही काही मला तू शिकवायलाच हवे! आज शिकून घेतले तर कधी उपाशी राहायची वेळ तर येणार नाही.।माधवला नाविन्याची आवड होती. नवनवीन गोष्टी करून पाहण्यात त्याला भारी रस वाटे, मग तो स्वयंपाक असो वा बागकाम, अभ्यास असो वा चित्रकला. एकदा मला समोर खुर्चीवर बसायला लावून त्याने माझ्या हातात एक पुस्तक दिले, दोन तास मी आरामात बसून ते पुस्तक वाचून काढले, तेवढ्या वेळात मधवाने माझे सुंदर चित्र काढून त्यात रंग भरले, अगदी तंतोतंत तर नाही मात्र माझी सुंदरता त्यात डोळ्यात

भरत होती. तो रेखीवपणा त्याने नेमका टिपला होता. त्याचा खेळकर लहान मुलासारखा स्वभाव फार अल्लड वाटायचा, बोलताना भारीच माजा येऊन जायची.आमचे दुपारीचे हे रिकामे धंदे मात्र अप्पा यायच्या आधी चालत, अप्पांसमोर मात्र कधी हा विषय आम्ही काढत नसू. आज भाजीला नेहमीसारखी चव अली नाही ग नंदे असं अप्पा जेवण झाल्यानंतर म्हणत. मी हळूच हसून माधवकडे पाही. तो मात्र डोळे मिचकावत घास घेत हसू लपवत जेवण घेई.

डोळे मिटून नुसत्या वासाने माझ्या हातची चव ओळखणारे अप्पांना मात्र माझ्या हातून फारशी भाजी चुकत नाही हे माहीत होते. आप्पांनी भाजीचा विषय काढला की माधव म्हणे.

हो ना अप्पा अगदी कसं बरोबर बोललात. लग्नाचे वेध लागले हो नवरीला. हल्ली कशातच लक्ष बसते बाईंचे. असे म्हणून दोघे माझी मस्करी करत हसत असत.मीही हसून वेळ मारून नेई.

दोन चार दिवसात माधव बऱ्यापैकी काम शिकला, माझ्या बारीकसारीक गोष्टी तो नेमका लक्षात ठेवी, फोडणी द्यायची पद्धत, भाजीला कांदा लसणाचा मारा करण्यापेक्षा भाजीची मूळ चव तशीच राखली जाईल हे ध्यानात धरावे हा माझा सल्ला त्याने

चांगलाच लक्षात ठेवला होता. त्याला आता नेमकेपणा आला होता.

त्या दिवशी बसल्या बसल्या त्याने मला विळीवर कांदा कापून दिला, तेव्हा त्याचे गाल रडून लाल झाले होते.

एखादा पैलवन आपले पिळदार बेडक्या असलेले दंड घेऊन समोर बसून आपल्याला कांदा कापून देतोय याचे मला फार हसू आले. तो मात्र त्याच काम मन लावून करत होता, सहज माझ्याकडे लक्ष गेल्यावर मला हसताना पाहून तोही हसला. का हसता ओ नंदाबाई! तो अप्पांची नक्कल करत म्हणाला.

एखादी स्त्री आपल्याला बायकी काम करताना हसते याचा खरं तर पुरुषी अहंकाराने त्याला राग यायला हवा होता, पण तरीही माझ्याकडे पाहून साहेब दात काढून हसताय याच मला अजूनच नवल वाटलं.लहानपणीचा तो हट्टी, हेकेखोर आणि चिडका माधव कुठे गेला असावा असा प्रश्न पडला!

माधव तुला राग आला नाही का रे?

मी न राहवून त्याला प्रश्न केला.

राग? तो कसला?

उलट कशाने का असेना तुमच्या चेहऱ्यावर आनंद आला हे काय कमी! त्यानं हसत उत्तर दिलं.

आम्ही दोघे गमतीने एकमेकांना अहो काहो करत.

, मी समजत होते त्यापेक्षा तो बराच वेगळा होता.त्याच्या बोलक्या स्वभावाने आमची गट्टी जमली. कधी तो कॉलेजच्या गमती सांगे तर कधी कोल्हापूरच्या आठवणी उजळत बसे! आई आणि अण्णाची आठवण येते असे सांगे! एकदा तर आता लग्न करून इथेच अप्पांच्या कडे बिऱ्हाड मांडावे असे म्हणला. तुझ्या लग्नानंतर त्यांना सोबत होईल बरी!! असे तो हसत म्हणाला तेव्हा पुन्हा माझे मन त्या काळजीने झाकोळले.

अगं ये कुठे हरवलीस? माधवने डोळ्यासमोर चुटकी वाजवत मला जागे केले! चार दिवसात माधव ठणठणीत झाला. फक्त जखम तेवढी भरायची बाकी होती. पण तो पुण्यत्मा काही स्वस्थ बसणार नव्हता.. एके दुपारी तो आजीकडे गप्पा मारत बसला असता, आजीला उद्देशून तो म्हणाला,

घरात माझ्या पाकलेची माहिती आजीला तर होतीच तरी आजी काही अप्पांना याबद्दल बोलली नाही. किव्वा मलाही टोकले नाही असं का? तेव्हा आजी हसून म्हणाली, तुला आनंद मिळतो ना मग केले तर काय जाते! आजीला आतापर्यंत माझा आनंद कधी दिसला नाही, काल परवा आलेला तो त्याचा आनंद मात्र दिसतो! मी चिडून उद्गागारलेलं वाक्य आजीला मात्र फारसं

ऐकू गेलं नाही, पण माधव ने मात्र ते ऐकलं आणि नेमकं ध्यानांत ठेवलं. आवड म्हणजे? काय गं कसली आवड आहे हिला आजी? आजीला एकदा निवांतपणे त्याने विचारलं तेव्हा आजीने माझ्या नाटकाच्या आवडी बद्दल त्याला सांगितलं.

त्या नंतर तासभर स्वतःमधला लेखक बाहेर काढून त्याने आम्ही दोनच पात्र असू असं नाटक लिहिलं.

दोघं मित्रांचे पात्र असलेले ते नाटक दोघे तयार होऊन नाटक पाहायला हजारो लोक आले आहेत अश्या आवेशात आम्ही बाहेर आलो, आमची एकुलती एक प्रेक्षक आजी खुर्ची मध्ये बसवली होती. माधवने सारासार करून दिवाणखान्यात मंच बनवला.

मी कधी नव्हे अप्पांचा कोट चढवून मधवाची एक पॅन्ट घातलुन तयार झाले.नाटकात दोघे मित्र काळू आणि बाळू आणि त्यांच्या संवादाला सुरवात झाली तशी आजीची हसून हसून पुरेवाट झाली.माधवाने विनोदी संवाद लिहिलाच असा होता की, मला एकएका संवादा नंतर हसू फुटे. असे काय करताय नंदाबाई . प्रेकां समोर असे हसू नये. आणि तुम्ही ठीक ठीक अभिनय केला नाही तर आम्ही दुसऱ्या कलाकारांचा शोध घेऊ हा! त्याने एखाद्या खवाट दिग्दर्शकाचा आव आणत मला दम भरला.

*नाटकीय संवाद..*

*बाळू- शिवनंदा*

*काळू - माधव*

*बाळू- प्रेमात तुझे डोके मठ्ठ झाले आहे काळू, मला तर एकटेच राहून आयुष्य किती सुंदर दिसते*

*काळू - अरे बाळ्या एकट्याचे ते ठीक झाले पण माझ्या सच्च्या प्रेमाला कच्चा दोर लागला, त्या सुंदरीने नायनबाण चालवून माझ्या कलेजाचा चुंडा मुंडा करून टाकला!!*

*आता मी कसे जगू! नाही आता मला जगण्याची इच्छा नाही.*

*(काही वेळ शांतता )*

*काळू- येतोस काय सोबत.*

*बाळू - कुठे*

*काळू - अरे पाण्यात उडी मारून संपून टाकतो सगळं*

*बाळू- प्रसंगी मी तुझ्यासाठी जीव देईल रे काळू पण पाण्यात नको. नाक गळते माझे. तेवढे मात्र कठीण आहे रे.*

*हे असं काहीसं विनोदी संभाषण*

माधवाच्या काळू बाळूच्या विनोदी लेखनाने मात्र आजी आणि मी खळखळून हसलो. दुपारभर आम्ही दोन तीन प्रयोग केले,

आमचे प्रेक्षक म्हणजे आजी आमच्यावर भलतेच खुश होते.त्या नंतर मी माझे अभिनय कौशल्य दाखवत अप्पांची नक्कल

करत दाराकडे पाठ करून होते. माधव आजीच्या खुर्चीला टेकून खाली बसला होता, माझी नक्कल पाहून दोघेही पोट धरून हसत बसले होते. माझ्यामागे आप्पा येऊन उभे राहिल्याचे माझ्या लक्षातच आले नाही. आप्पा माझ्याकडे गंभीर नजरेने पाहत उभे होते. पुढे काय होईल याचा अंदाज येणार नाही असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर पसरले होते.

अप्पांना दारात पाहून माधव आणि आजी अचानक हसायचे बंद झाले. का हे पाहायला मागे वळाले तेव्हा त्यांना दारात उभं पाहून माझी बोबडी वळली.

अप्पांना पाहून मी आता भोवळं येऊन पडते की काय असं वाटायला लागलं, डोळ्यात पाणी आलं हृदयाची जोरदार धडधड ऐकू यायला लागली, घाबरून जमिनीकडे लावली, ते पाहुन की काय अप्पा जोराने हसायला लागले. मी चमकुन आप्पांकडे पाहिलं

अरे देवा! मी स्वप्न तर बघत नाही ना? असं समजून मी दोनदा डोळे चोळून अप्पांकडे पाहिलं, आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते खरंच हसत होते! माझ्या चेहऱ्यावर मात्र नवलाई पसरली होती!

## *अप्पा*

हल्ली नंदा फारच बोलकी झाली आहे, चेहऱ्यावर नवं तेज आल्यासारखं वाटतं, खरं तर माधवाने येऊन आमच्या कुटुंबावर आनंदाची नवी मोहोर उमटवली, आम्हा तिघांना जणू नवा सवंगडी मिळाल्याचा आनंद गवसला होता. माधवाने आल्या दिवसापासून घर आपलसं करून घेतलं होतं, त्याला पाहून मनात येऊन जाई. आपल्याला एखादा मुलगा असता तर माधवा एवढाच असता नाही का.!! ।माधवचे विचार नवतरुणांसारखेच नव्या पिढीला साजेसे होते, पण माझे विचार तो कधी खोडून काढत नसे,

उलट त्यात एखादं उदाहरण देऊन त्याची बाजू पटवून देई, हळू हळू नकळतपणे मलाही ती गोष्ट पटायला लागली की मी ती मान्य करी!

हल्ली आई कंटाळा येतो असे म्हणत नाही, नंदा उदासीन चेहरा करून बसत नाही याने मला फार समाधान वाटतं. माधव म्हणजे अखंड बडबड, नुसता खडखडाट पण काही असो त्याच्या येण्याने मात्र घरभर आंनद मात्र पसरला होता,

मागच्या महिन्यात बालगंधर्वला मोठे दिग्गज कलाकार येणार असे कळले, दामोदराने हाताला धरून ओढतच तिकडं नेलं, त्या दिवशी तिथे नंदा दिसली.

ही इथे काय करते. या विचाराने डोकं तापलं. अभ्यासासाठी जाते असं म्हणून बाहेर पडलेली आपली पोर असे भटकून घरी येते का! ।

क्षणात डोकं भडकलं, पण पुन्हा मात्र ती दिसली नाही, मला भास झाला का?

नाही!

भास अजिबात नाही मी माझ्या नंदाला ओळखायला चुकायचो नाही! ती तीच होती हे मला कळले, पण कोण जाणे घरी जाऊन तिच्यावर ओरडणे मला काही जमले नाही! ।तिचा घाबरा चेहरा पाहून बोलणे नको वाटले. दामोदरच नाव सांगून विषय संपवला, मात्र ती पुन्हा असे करायला नको म्हणून तीच्यावर फार विश्वास आहे हेही सांगायला विसरलो नाही! बघता बघता किती मोठी झाली नंदा, अशी दुडू दुडू करत ती घरभर पाळायची, तिच्या बाललीला पाहण्यात भारीच मौज वाटायची, मग नवीन काम शिकताना होणारी धांदळ असो वा स्वयंपाकाचे अळणी-खारट ते तिने स्वतःच सांभाळून घेतले,. आई वाचून वाढलेली पोर मी एकदा

तिला मारल्याचे आठवते, ती न सांगता कुठेतरी गेली होती, जीव कंठाशी आला होता. वेड्या सारख तिला गावभर शोधत होतो, शनिवार वाडा शोधला आणि अगदी पर्वती पर्यंत जाऊन आलो, संध्याकाळी ती आली तेव्हा रागाच्या भरात तिच्या कानाखाली लगावली, त्या दिवशी मला अन्न गेले नाही.

आई. खूप रडते का ग ती? आईला विचारलं.आधी मार मार मारायचे आणि मग दुखते का विचारायचे. असं म्हणत आईनेही बोलणे टाळले, ।।

पण झोपेसाठी अंथरून टाकताना, ती एक वाक्य म्हणाली ते मात्र फार लागलं, आई वाचून पोर ती, आई तू पाहिजे होती असं म्हणून रडत होती.!! पुन्हा बाप पण दाखवशील मात्र आईपण दाखवायला कोणी नाही हेही ध्यानात ठेव. त्या दिवशी शिवनंदा वर हात उचलला तो शेवटचा. तो दिवस आजही जसाच्या तसा आठवतो, जेव्हा शिवनंदाची आई या जगाचा निरोप घेऊन गेली.. असाध्य क्षयरोगाने पिडून गेली होती ती. एकांतात अनेकदा ति आपण फार वेळचे सोबती नाही, असं म्हणून तीचे डोळे भरून यायचे, सोबत करू शकले नाही म्हणून क्षमा मागताना मलाही अपराधी वाटायचे. फार वाईट वाटत असे त्यावेळी.

नंदा पाच वर्षाची होती, सर्वांचा आग्रह होता मी लग्न करावे, पण जेव्हाही त्या चिमुकलीकडे पाही लक्ष्मीची प्रकर्षांने आठवण होई! फारच निरागस होती ती, तिच्या अप्पा आई कुठे गेली या भोळया प्रश्नानं मन खायला उठायचं, त्या वेळी अनेकदा दुसरं लग्न करावं म्हणून आग्रह झाला पण मला आता संसारात मन लागेल असे वाटेना, माझा मारुतीराया माझ्याकडे लक्ष देईलच त्यासाठी नवा संसार थाटायला हवाच का असा विचार राहून राहून मनात येत असे. माझे विचार तोकडे पडतात असे आई म्हणायची, लेकराकडे पाहून तरी विचार कर असं सारखं ऐकून शेवटी कंटाळून लग्नासाठी होकार कळवला, लग्नाची तारीख ठरली, पैपाहुण्यांची लगबग झाली, पुन्हा नव्यानं बोहल्यावर चढायची तयारी झाली, आंनद काही फार नव्हता, मात्र नंदा कडे पाहून वाटायला लागले की हिला आई हवी पण त्याच वेळी दुसरे मन हेही सांगे, की सावत्र पणाचे सावट हिच्या आयुष्यावर नको. लग्नासाठी गावी जाण्यास दोन दिवस बाकी असतानाच तार आली, नवरी मुलगी निर्वातली. पदराला आग लागून भरल्या मंडपात नवरी जळून मेली! ऐकुन काळजाचा ठोकाच चुकला. मन अक्षरशः थर्रररारल. त्या क्षणी वाटलं नकोच तो मृत्यूचा खेळ. तेव्हा खरच वाटलं मृत्यू हा माझ्या कुंडली मध्ये ठाण मांडून बसला आहे, दोन जीव गेले आता अजून नको ते शेवटचच पुन्हा मृत्यू पाहणे कदाचित मला झेपावले नसते,

लाडकी शिवनंदा मोठी होऊ लागली, तसा पुन्हा विवाह करण्याचा विचार मागे पडला, नंदाच बालपन फार निरागस होत अखंड वेळ तिला पाहण्यात आणि आरडाओरडा करण्यात जाई, ।ती मूळची अबोल तिच्या आईसारखीच,

फारशी बोलत नसली तरी मनातल्या अनेक गोष्टी न बोलता कळून घेण्याची कला मला आता अवगत झाली होती. माधवाच्या या दुखण्याने माझ्याही जीवाला घोर लावला होता.पण तरुण रक्त ते फार फार तर चार दिवसाचे दुखणे. आणि खरंच चार दिवसातच तो व्यवस्थित चालू फिरू लागला. अजून दोन चार दिवस आराम करून मग कामावर पुन्हा रुजू होतो असं तो काल म्हणाला. .नंदाच्या सासरकडून तार आली, लग्न विधी मानपान सगळं आमच्याकडे लागून असेल असे पुन्हा सांगितले होते.घरच्या किरकोळ खरेदीला, नंदा जाऊन आली. माधवही आज कामावर हजर झाला होता, तिने माझ्यासाठी नव धोतरं, आणि आईसाठी नवी साडी खरेदी केली होती,. कारटी नको तिथे खर्च करते, स्वतःसाठी काय हवं ते घ्यायचं, सगळ्या गावासाठी खरेदी करण्याची काय गरज . मी काहीश्या नाराजीने म्हंटलं तेव्हा ती म्हणाली असुद्या हो आप्पा, तसही तुम्ही स्वतःसाठी काही घेत नाही. आणि कुटुंब म्हणजे गाव असते का? लग्न जवळ आहे, गाठीशी चार पैसे हवे.असे माझ्या ओठांवर येऊ पाहणारे वाक्य मी

घशातच गिळले, शेवटी बायका फारसा व्यवहारी विचार करताना दिसत नाहीत,. मात्र तिच्या चेहऱ्यावरच्या आनंदाने सर्व व्यवहार धुळीस मिळवले. आईला लग्न ठरल्याचे समाधान वाटले, मात्र माधवाला पाहून तिच्या मनी हुरहूर दाटत असावी, कित्येकदा मला ती बोलून दाखवे,. तेव्हा भूतकाळाचे ओरखडे मनात सलत.

त्या दिवशी साप्ताहिक सुट्टी होती, माधवला घेऊन मी सोनाराकडे जाणार होतो, दागिने घडवून घ्यायला हवे असे माझ्या मनात चालले होते. माधव अर्ध्या रस्त्यात गेल्यावर मला म्हणाला, अप्पा तुमच्याकडे नवीन गोष्टींच स्वागत नेहमी नाकारात्मकतेने का केले जाते मला कळत नाही!! अरे मानवी स्वभाव आहे तो.!

सहसा नवीन गोष्ट असली की विरोध हा आलाच, आधी

विरोध मग थट्टा आणि शेवटी कौतुक असते.

त्यात पुणेकरांना आपल्या तोंडावरच्या गोष्टी पटकन बोलून दाखवायला आवडतात एवढेच काय ते वेगळे.

बाकी देश तसा वेश!! . त्यांनी हसत उत्तर दिले.

"पण हे नक्की कशाबद्दल बोलतो पुणेकरांच्या खोडसाळपणासाठी की एखाद्या व्यक्तीसाठी"?

तो काहीसा शांत झाला, त्याचा चेहरा गोंधळल्या सारखा दिसत होता. अप्पा.!! एखाद्या स्त्री ने व्यवसाय सुरू करावा या बद्दल तुमचे काय मत आहे? प्रश्नार्थक नजरेने पाहत तोंडावर पडणाऱ्या ऊन्हाकडे डोळे मिचकावत त्याने शेवटी विचारलंच. असं मधवाने मला विचारले तेव्हा साहजिकच मी किती आधुनिक आणि पुढारलेल्या विचारांचा आहे हे पटावे याच अनुषंगाने उत्तर सांगितले.. " एखादी कला असेल आणि कौटुंबिक पाठिंबा असेल तर काय बिघडले ".!

माझ्या उत्तराने माधव काहीसा समाधानी दिसला. गोंधळलेल्या चेहऱ्यावरच्या रेषा आता पुसट झाल्या.

अरे वाह! मग शिवनंदा तर उगाच घाबरते.

ती उत्तम स्वयंपाक करते मी तिला आमच्या कॉलेजातल्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी

खानावळ चालू कर असे सुचवले!! हा उत्तम व्यवसाय आहे होय ना? .माधवाच्या अनपेक्षित प्रश्नाने मी काहीसा गोंधळलो. चेहऱ्यावरची नकारात्मकता लपवण्याचा प्रयत्न करत मी उत्तरलो.

हे बघ माधवा आधुनिक विचाराने म्हणशील तर शिक्षण उत्तम घ्यावे, आणि व्यावसायिक गोष्टींनाही काही विरोध नाही मात्र, नंदाच्या मनात असे काही भरवलेस हे मला काही आवडले नाही.

तिचे आता लग्न ठरले आहे, लग्न करून तीने उत्तम संसार करावा हीच अपेक्षा.

मुळात घरात कर्ते पुरुष असताना कशाला हवे बाईमाणसाला हे असले धंदे! घरात कसली चणचण नाही, आर्थिक अडचणी नाहीत मला आणि माझ्या कुटुंबाला व्यवस्थित सांभाळू शकेल एवढे तर मी नक्कीच कमावतो, त्यासाठी तिला काही करण्याची गरज नाही! ।रागाने माझे कान गरम झालेले मला जाणवले.फक्त पैशासाठी नाही आप्पा! " ती गोष्ट तिला स्वावलंबी बनवेल"! तो माझं वाक्य तोडत बोलला. हे मात्र अति झाले. माधव या पुढे अजून एखादा शब्द बोलला असता तर कदाचित माझ्या रागाने वेगळे रूप धारण केले असते.

बस्स ..!!!!

यापूढे या विषयावर मला एक शब्दही ऐकायचा नाही.।तो आपल्या घरी पाहूणा आहे हे मी क्षणभर विसरलो. नंतर माझेच मला वाईट वाटले. त्या दिवशी घरी येई पर्यंत तो माझ्याशी एक शब्दही बोलला नाही.

लहानपणी नंदाला ओरडल्यावर जसं वाटायचं तसंच काहीसं आता वाटत होते.त्याच्याशी आपणहून बोलावे का? असे मनात आले. पण छे! माझ्या मताची माती करून करून आपणहून संदी

करणे मला कमीपणाचे वाटले! घराचे दार वाजले तशी शिवनंदा पळतच बाहेर हातातली पिशवी घेण्यासाठी आडवी झाली.पण आपण दुसऱ्याच्या घरी आलो आपल्याला इथे तरी रुसण्याचा अधिकार नाही या विचाराने असेल की काय तासाभरात माधव नेमही सारखा वागू लागला.

त्याच्या लाडक्या आजीशी आजही त्याने ढीगभर गप्पा मारल्या, नंतर खोलीत येऊन अप्पा माझे चुकले मी फक्त तुमचे मत जाणून घेन्याचा प्रयत्न करत होतो असे म्हणाला. असो माझा राग चुटकीसरशी निवळतो हे एव्हानं त्यालाही माहीत झाले होतेच.

पाय बरा झाल्यावर त्याने पुन्हा खालच्या घराचा ताबा घेतला.! मीही काही बोललो नाही.

खर तर त्या खानावळीच्या प्रकरणानंतर माधवणे आपली हुशारी आणि आधुनिकता आपल्याच जवळ ठेवावी असे मला वाटायला लागले. उगाच नंदा च्या डोक्यात भलते काही भरवून देईल याची एक अनामिक भीती निर्माण झाली. पण माधव मात्र मनकवडा होता एवढं मात्र नक्की. मनातल्या गोष्टी तो अचूक ओळखत असे. त्याचाच भाग की काय त्याने आपले बिर्हाड खालच्या माळ्यावर हलवले, अभ्यासाचे कारण दिले असले तरी त्यातली सुचकता माझ्या लक्षात आली..

असो एका अर्थाने बरंच झालं.

सुपारी फोडून आता एक मास होईल, उद्या आपली लेक सासरी जाईल या विचाराने मन उदास होते, शेवटी विधात्याने जे लिहून ठेवले ते कोणास टाळता येते!

त्यात भर म्हणून की काय आईची प्रकृती खालावली. दम्यानं तिच्या शरीराचा संपूर्ण ताबा घेतला, त्यात म्हातारपनाने आता शरीर पहिल्या सारखे साथ देईना झाले आहे. नंदा आता आईच हवं नको ते सगळं फार काटेकोर पने बघते, आजारपणातील हवी ती सगळी सेवा ती करते, तिला हे सगळं करताना पाहून एक दिवस या घरात एकटा साहाय्य बसलेला मुकुंदा आठवतो.. उरले आयुष्य एकट्याने काढावे लागणार हे तर नक्की होते, मात्र त्याची दाहकता आधी लक्षात येत नव्हती. आता या विचारानेच आनंद हरवून जातो. अकल्पित आयुष्याच्या आभास निखाऱ्यागत भासतो.

मन उदास होते.एखादा जीव जेव्हा जन्माला येतो तेव्हा परमेश्वराने दिलेले शरीरुपी जीवन निरागसता किती सुंदर असते, तारुण्याच्या बहरात धडपड चालू होते ते आपलं अस्तित्व टिकवण्याची. तो आपल्या बीजाचे रोपन करतो, सांसाररूपी वेलीवर नवे फुलंफळ बहरतात. आयुष्य सुखाचे झाले असे भासते.

पण खरंच हे सुख का? वस्तुस्थिती पाहता आज माझ्या अस्तित्वाला प्रश्नचिन्ह निर्माण झाले असे म्हणणे उचित होईल का? सर्वच निरर्थक, आता विचार करूनही काय फायदा म्हणा. तरीही मन खाते .

कसे आवर घालावा याला कळत नाही!! आपल्या मानाचे दुखणे पाहून नंदाचं मन माहेरी गुंतू नये म्हणून कधी जाणवू दिलं नाही, मात्र आता.. आता भीती वाटते. एकटं पडण्याची. भीती वाटते. एकटं आयुष्य कंठायची. काही दिवसांतच आईनेही निरोप घेतला.

फार दुःख झालं, त्या दिवशी मात्र सगळं दुःख मून्मळून बाहेर आल्या सारखे वाटले. रडू आले मात्र पुरुषांनीं असे रडणे शोभत नाही. म्हणून असावे गिळली.

आईच्या पार्थिवाकडे पाहताना गळयात गोळा अडकला होता. मलाही रडायचं होतं. मनात खूप काही साठून होतं, परंतु रडणे शोभणारे नव्हते, आई गेली आणि माझ्या एकट्याच्या प्रवासाला समोर जायची तयारी माझं मन करु लागलं.

## शिवनंदा

माधवचं दुखणं बरं झालं, आणि तो कामावर पुर्ववत झाला तसा पुन्हा एकदा दुपार भकास जायला लागली, मात्र तरीही तो आठवणीने माझ्यासाठी पुस्तक आणून देई.गेल्या महिना भरात अनेक कादंबऱ्या अनेक कथा मी एका बैठकीत वाचून काढल्या होत्या.

पर्वा त्याने एक पुस्तक आणले होते, त्यात एक स्वावलंबी स्त्री ची कथा वाचून मनात आले,

माझे स्वतःचे असे काही अस्तित्व आहे?

छे! बायकांना कसलं आलय अस्तित्व, चूल आणि मूल हेच तर शिकत आले लहानपणा पासून यापलीकडे कोणता विचार मीही केला नाही कधी.,

माधवला त्या दिवशी मी याबद्दल सांगितले, तो हसत म्हणाला, नंदाबाई व्यवसाय किंवा, नोकरी केल्याने सगळयात पहिली गोष्टही घडते की माणूस स्वावलंबी होतो. उद्या तू लग्न करणार सासरी जाणार घरातल्या लहानसहान किव्वा तुझ्या गरजेच्या गोष्टी घेण्यासाठी सुद्धा तुला त्याचा हिशोब द्यावा लागला तर तुझ्या मनात ती भावना नेहमी राहील की आपण काहीही कमवत नाही. जेव्हा आपण आपल्या व्यवहाराचा एक प्रवाह निर्माण करतो तेव्हा एक स्वावलंबनाची भावना येते.. त्यातून निर्माण होतो तो आत्मविश्वास, आणि खूप सारा आंनद. कारण नकळत आपल्या सभोवताली असलेलं लोक आपले अस्तित्व मान्य करू लागतात. बऱ्याचदा सुरवात करण्यासाठी आपल्याला थांबवते ती आपल्या मनातली भीती. लोक काय म्हणतील या भीतीने न जाणे किती स्वप्नांचा गर्भात गळा आवळला आहे हे नव्यानं सांगायला नको! परावलंबनाची भावना आपल्याला व्यवहारातले काही कळत नाही किव्वा आपण अक्कलशून्य आहोत हा विचार निर्माण करते. मग आपण एखाद्या अनामिक भीती पोटी पुढे जाणे टाळतो. आता तू म्हणाशील म्हणजे काय परावलंबन म्हणजे एखाद्या गोष्टी साठी दुसऱ्यावर अवलंबून राहणे, आणि स्वावलंबन म्हणजे प्रत्येक गोष्ट करण्यासाठी सक्षम असणे. बरोबर ना? मग विचार कर परसात लावलेली फुलबाग तु तुझ्या

कष्टाने फुलवली, त्यातली बहरलेली फुलं काढुन एक सुंदर गाजर तू विणला, बाजारात जाऊन थोड्याश्या पैशाला विकला तर ते पैसे माझे आहेत मी कुठेही खर्च करू शकते हा आंनद आणि हक्क तुझ्याकडे असेल, त्या पैशाची तू अमूक अमुक गोष्ट घेतली .तर तीच गोष्ट घेण्यासाठी तुला अप्पांकडे पैसे मागावे लागले असते. का हवेत हेही सांगावे लागले असते, पण ती एक गोष्ट तू स्वतःच्या मनाने घेतली तर!

तर.

तर.

मला जे हवे ते मी मिळवू शकते, हा आत्मविश्वास येईल स्वतःला जगता येईल एवढं कमवू शकते मग मला जगण्यासाठी कोणावर अवलंबून राहण्याची गरज नाही! मान खाली करून जगण्या पेक्षा ताठ मानेने जगलो तर जगाला आपले अस्तित्व दिसते!!

मी आनंदून टाळी वाजवत म्हणाले.. माझा चेहरा आनंदाने चमकत होता, मी कौतुकाने माधवकडे पाहिलं, त्याने हे सांगितल ते अजून पर्यन्त मला कधीच कोणी सांगितलं नव्हतं.मगही ही व्यवसाय करु शकते? मी काहीश्या साशंक मनाने विचारले. ।हो!! का नाही? नक्कीच करु शकते. देशाची प्रथम नागरिकही एक स्त्री

होऊ शकते तर तुला तर फक्त व्यवसाय करायचा आहे! पण मी काय करु शकते. मला काय येतं? माझ्या खुललेल्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले. स्वयंपाक तेवढा येतो! म्हणजे मी खानावळ चालू केली तर? मी आनंदून म्हंटलं! ।हम्म चांगला व्यवसाय आहे. आमच्या वसतिगृहाच्या मुलांसाठी जेवण बनवले तर? त्याने उत्साहाने कल्पना सुचवली. ।शेवटी अप्पांच्या समोर कोण बोलणार माझी तर या जन्मात हिम्मत होणार नाही हे माधवलाही माहीत होतं.

दुसऱ्याच दिवशी त्याने अप्पांना विचारायला सांगितलं! अप्पा म्हणजे मोठा जहाल माणूस! बाईमाणसाने असले धंदे करु नये असे ठाम मत.

बरे मी वेळीच आवरतं घेतलं नाहीतर माझी कानशिले गरम झाल्यावाचून राहीली नसती! तो डोळे मिचकावत म्हणाला. दोघेही हसलो. पण नकळत त्याने माझ्या मनात स्वावलंबनाचे बीज पेरले.

तो नेहमी उत्साहाने भरलेला झरा वाटायचा.

त्याच्या आवडीचे पदार्थ बनवून त्याला खाऊ घातल्यावर समाधान वाटायचं तोही माझ्या कलेचं भरभरून कौतुक करण्याचा. कधी कधी हौशी गृहीनींसारखा मला कृतीही विचारायचा. मला त्याची फार गंमत वाटायची. उलट सुलट प्रश्न करून एखाद्या द्वाड

विद्यार्थी सारखा भंडावून सोडायचा. म्हणजे कधी कधी माझ्याकडे उत्तर नसायचं, " नंदा मला सांग चहा नेमका किती मिनिटे उकळत ठेवला की तू बनवते तशी चव येईल. "?

" तू भाजी व्यवस्थित शिजावी म्हणून वरून पाणी टाकते त्याच प्रमाण किती असतं "?

" फोडणी ची पद्धत अशीच का? त्याचे असे असंख्य प्रश्न असायचे. माझं उत्तर मात्र ठरलेलं. " अंदाजाने येते आपोआप "

जणू त्याला एवढे सगळे बारकावे टिपून घेऊन एक दिवसातच स्वयंपाक येणार होता.

दिवस जात होते. पुन्हा कॉलेजला जावं असं फार वाटतं. आता काय लग्न होईल अप्पांची खूप आठवण येईल.

शेजारच्या दामोदर कानांनी नुकताच टेलिफोन आणला आहे असे कळलं. हे मात्र बर झालं वरचे वर खबर बात कळत जाईल. त्याने खालच्या खोलीत आपले समान हलवले हे मला काही पटले नाही. मी आता त्याच्याशी अबोलाच धरला होता. जेवणासाठी वर आला तरी मी कामाशिवाय त्याच्याशी बोलत नाही. एके दिवशी तो बागेतल्या फुलांना पाणी देत होता. मी सहज खाली उतरले, एक माणूस रुसलंय वाटतं आमच्यावर.! मला येताना पाहून तो गालात

हसत म्हणाला. मला बोलायचंच नाही तुझ्याशी! मी गाल फुगवून म्हणाले. चेहऱ्यावर लटका राग आणत मी त्याला सुनावलं.

अस्स!!

का नाही बोलायचे बाईसाहेबांना? त्याने पुन्हा गालात हसत विचारलं

मी का सांगू? मी आणखीनच चिडले

का सांगू म्हणजे!! सांगितल्या शिवाय आम्हाला कसे कळेल हो? त्याचा मस्करीच्या स्वर कायम होता.

माहीत आहे ना सगळ मग का पुन्हा पुन्हा विचारतोस!! आता मात्र माझा पारा चढला मी जरा जास्तच चिडून बोलले

मग राहीलं.!! तो पुन्हा मस्करीच्या सुरात हसला

खरं तर मला जास्त चीड त्याच्या हसण्याची येत होती.

मला जणू आता त्याच्या बडबडीची सवयच झाली होती, चीड नक्की कसली येत होती ते निश्चित कळेना मात्र त्याच्या हसण्याने अजूनच आगीला फुंकर घातली गेली.

मला न सांगताच तू आपले समान खाली हलवले, एवढेच त्रास होतो आमचा अभ्यासात तर तसे सांगायचं आम्ही ध्यान ठेवलं

असत तुला त्रास होऊ नये याचं! माझ्या खोचक बोलण्याने तो काहीसा गंभीर झाला.

"तस नाही शिवनंदा".. मग कस? मला आता कारण ऐकून घेण्याची फारच उत्सुकता लागली होती.

त्याच असं झालं.त्यानं चेहऱ्यावरची मस्करी लपवत तो गंभीर आवाजात म्हणाला. मी कान देऊन त्याच्या मुखातुन बाहेर पडणाऱ्या शब्दांची वाट पाहत उभी होते, तेवढ्यात त्याने भसकन अंगावर थंड पाण्याचा मारा केला.थंडगार पाण्याने सगळे अंग थरथरलं.

आ!!! माधवा!! थांब तुझ्याकडे बघतेच मी थरथरत्या आवाजात म्हणाले, त्याच्या मागे पाण्याचा मारा करत धावत पळत तो शिवाशिवीचा खेळ रंगला.

मात्र माझ्या पेक्षा दहापट चपळ तो माझ्या हाती लागेल तर शपथ!! थोड्या वेळानं काहीशी हुडहुडी भरल्यावर मी वर जाऊन साडी बदलली.

थोड्या वेळाने तोही आला, कधी कधी मोकळा वेळ असल्यावर तो मला स्वयंपाक घरात मदत करत असे.

नक्कीच त्याचीही समाजसेवा फक्त अप्पा नसतानाच चालत असे! तो समोर बसला की भाजी चिरूनं, लसूण सोलनं कांदा कापनं अशी काम मी त्याच्यापुढे देई! तोही मन लावून सगळं करत असे.

तोही आता उत्तम स्वयंपाक शिकला होता.

मला तो नेहमी म्हणत असे कोणतंही काम छोटं नसत."छोटा असतो तो आपला दृष्टिकोन".!!

अशी आमच्यातील छोटे मोठे रुसवे फुगवे जास्त वेळ टिकत नसत! मुळात त्याच्या बडबडीची एवढी सवय झाली होती की त्याला बोलल्या शिवाय आणि मला त्याच्या पांचट गोष्टी ऐकल्या शिवाय आमचा दिवसच सरत नसे.मैत्री किती अवखळ आणि सुंदर असते हे नव्यानं उमगलं आमच्या मध्ये सुंदर आणि निखळ मैत्रीचा सुंदर धागा विणला गेला. मध्यंतरी आजी गेली. तेव्हा मी धायमोकलून रडले, मनातलं होत नव्हतं तेवढं सगळं दुःख एकाच वेळी आल्या सारख वाटलं आई नंतर माझं सगळं पाहणारी आजीचं होती. माधवलाही आई फार जवळची वाटायची तोही तिच्या जाण्याने काहीसा गहिवरला. सगळ्या पाहुण्यांना पत्राने कळवले! क्रीयाकर्म आणि विधींसाठी जमेल तसे नातेवाईक जमले होते! काहींची पत्र पोहोचली तर काहींची अजून रस्त्यात

असतील.तेव्हाच आजीचा दहावा उरकला. गिरिधर काकाही भेटून गेले.

आता माझ्या एकटेपणात आणखीनच भर पडली. घरात मला एकटीला अजिबात करमत नाही! दिवाळी तोंडावर आली होती, लग्नाला दोन महिने बाकी होते! आता मला त्या घराकडे पाहून अप्पांच कस होईल असं वाटायला लागलं. एकटे पडलेले अप्पा आठवले की मन कासावीस होई! तेव्हा वाटलं मी मुलगा असते तर किती बर झालं असत! निदान म्हतारपनीचा आधार तरी बनले असते अप्पांचा. एक दिवस मी माधव जवळ विषय छेडला. हल्ली मला घर खायला उठते, करमत नाही रेडिओ वर गाणे लावले तर त्यातही रस वाटत नाही. कुठे बाहेर फिरून यावं असं वाटतंय. त्यालाही माझ्या बोलण्यातली सुचकता कळली असावी. हल्ली मला एखादि गोष्ट अप्पांकडून मिळवायची असली की मी माधवचा वापर मध्यस्थी म्हणून करी. गमती गमतीत तो विचारून टाके कधी आनंदात असले तर अप्पा होही म्हणत!! तर कधी रागात असताना प्रकरण अंगाशी येई.एकदा असेच काहीतरी झाले, त्या दिवशी दुपारी सरिता घरी आली. सरिता माझी लहानपणापासूनची मैत्रीण

दहावी "अ" च्या माजी विद्यार्थ्यांनीं मिळून परवाच्या दिवशी भेटायचे ठरवले आहे. तूही येणार आहेस हा, आत्ताच सांगतेय

कुठलेही कारण चालणार नाही.!! असे तिने मला खास माझ्या घरी येऊन सांगितले होते.

जाण्याची फार इच्छा होत होती. रोज रोज घरात बसून मला आता कंटाळा आला होता.जुन्या मैत्रिणी भेटतील या नुसत्या विचारानेच मन उल्हासित झाले!

माधवला याची कल्पना दिली, मात्र तो म्हणाला मी तुम्हाला किती दिवस पुरणार आहे नंदाबाई?

माणसाने आपलं मत ठाम पणे मांडायला शिकलं पाहिजे. मग विचार बोरबर की वाईटही गोष्ट नंतर येते. एवढ्या वेळी मदत कर ना पुढच्या वेळी मी बघेन काय करायचं ते असं काहीस म्हणून मी वेळ मारून नेई.जेवणाच्या वेळी अप्पांना विचारायचे असे त्याने ठरवले. अप्पा आपली शिवनंदा आता परकी होईल ना हो! शांत वातावरणात त्यांना अशांततेची तुरटी फिरवली.अप्पा काहीसे गहिवरले,

अप्पा भाजी वाढू का? हा वाढ थोडी!! अप्पाही होकार देत म्हणाले. बघा ना अप्पा किती मोठी झाली एवढीशी होती, आता लग्न होईल सासरी जाईल. माधव विषयाला हात घालण्या आधी माहोल तयार करत असे. शिवनंदा आता हवे ते करून घे हो! उद्या लग्न झाल्यावर कुठे मिळते स्वतंत्र्य, आवडीच्या गोष्टींची हौस

करून घ्यायला हवी होय की नाही अप्पा!! अप्पा फक्त हं.!! एवढंच म्हटलं

माधवणे माझ्याकडे एकवार पाहिलं।। पुढचं बोलायला तोंड उघडलेच होते की अप्पा पुढे म्हणाले,

आता कुठे जायचे? अनपेक्षित प्रश्नानं मी काहीशी गोंधळले. आप्पा माझ्याकडे रोखून पाहत आहेत हे पाहून माझी पुन्हा एकदा त. त. म. म. झाली.

अग सांग की!! अ... विद्यार्थी मेळाव्याचे ठरले आहे.. त्याचे आमंत्रण मिळाले आहे! मी घाबर्या आवाजात म्हणाले, अप्पा हसले आणि म्हणाले, मग एवढी घाबरतेस का. काही गोष्टींना माझा विरोध असतो याचा अर्थ असा नाही की मी सगळ्याच गोष्टी साठी मी नाही म्हणेल! जायचे तर जा फक्त तिन्हीसांजेच्या आत घरी या!

आणि हो सारखी सारखी तुला हिची वकिली करायची गरज नाही बर का माधवा! असे म्हणत हसत त्यांनी माधवच्या पाठीत एक धपाटा घातला.

तोंडातला घास मोठ्या कष्टाने गिळत तो कसानुसा हसला.!! चेहऱ्यावरचे कष्ट मोठया कष्टाने लपवत तो हसला. पाठीतला धपाटा किती जोराचा असेल हे आवाजावरून लक्षात आलं. या वेळीही चेहरही अगदी तसाच मोठ्ठा लाडू घशात अडकल्यासारखे

झाला होता. मात्र तो काही बोलला नाही. आजच्या साठी एव्हडे पुरे असेच त्याला वाटले असावे.आजही पुन्हा तसेच एकटे वाटत होते! पर्वतीवर जाऊया का? पळतच मी त्याच्या खोलीच्या दारात येऊन उभी राहिले. माधव त्याच्या खोलीत पुस्तकात डोकं घालून बसला होता, त्याने वरही न पाहता उत्तर दिलं.

अप्पांशी सल्लामसलत करून घ्या!! आमची काहीही मदत होणार नाही! आणि तसही मला भरपूर कामं आहेत, आणखी कुणाला तरी सोबत घेऊन जा.

असं कसं.. चल ना तूही सोबत आणि तसही पुण्यात आल्यापासून फारसे पुणे तू पाहिले नाही!!

तेव्हा फिरणे होईल! मी काही वेळ त्याच मन वळवण्याचा प्रयन्त केला पण मला काही यश येईना. तो एकदाही वर न पाहता पुस्तकात डोकं घालून बसला होता, माझ्या बोलण्याला काडीची किंमत नसल्यासारखं त्याचं आजचं वर्तन मला खटकलं. एवढा आग्रह करूनही तो तसूभरहीही हलला नाही की त्याने मान वर करून माझ्याकडे पाहिले नाही! त्याचे असं निगरटासारखं वागणं मला अजिबात आवडलं नाही! । सहसा मला राग येत नसे मात्र त्या दिवशी नाकाचा शेंडा लाल झाला! । 'नाही यायचं तर नको येऊ मलाही काही गरज नाही" असं म्हणून रागातच त्याच्या खोलीतून

बाहेर पडले. जो पर्यंत तो स्वतःहुन बोलत नाही तोवर मीही त्याच्याशी बोलणार नाही असं ठरवलं.. दोन दिवस झाले तरीही अबोला कायमच होता! त्यानेही प्रयत्न केला नाही निगरटासारखा समोरून गेला तरी दुर्लक्ष करून जयचा. मग अशा वेळी मनात भयंकर उलथापालथ होई. चिडचिड करून कमी करावी म्हणून, शेवटी शेजारच्या सरीताकडे जाऊन बाहेर जायचं ठरवलं, या वेळी अप्पांची परवानगी घ्यायला मला जरा सुद्धा वेळ लागला नाहीं, मी एका दमात विचारून टाकले, अप्पा सरिता सोबत उद्या पर्वतीला जाऊन येऊ का? घरात एकटीला कंटाळा येतो! अप्पांनी क्षणभर माझ्याकडे रोखून पाहिलं, मग ठीक आहे असं म्हणत ते पानावरुन उठले.

एवढी हिम्मत एकवटून अप्पांसमोर मी बोलले याच त्यांना थोडं विशेष वाटलं असावं. पण अप्पांसोबत जेवणाऱ्या माधवला पाहून अंगात वीज संचारली. त्या रागाने का होईना मी कोणाला घाबरणे सोडले.

कारण एकच! त्याला मला दाखवून द्यायचं होत की मी कोणाला घाबरत नाही. त्याला मधे घालते म्हणून मी दुबळी आहे असे समजतो का हा! अप्पांना असे थेट विचारल्यावर मात्र एक गोष्ट ध्यानात आली एवढंही अवघड नाही जेवढं मी समजत

होते.दुपारी सरिता सोबत मी पार्वतीला गेले, एकाच वर्गात असल्याने यांच्याकडे विषयाला तोटा नव्हता.चढता चढता एका जागी धाप लागली म्हणून बसलो. तुमच्या घरी नवा भाडेकरू आला काय ग? तिने प्रश्नार्थक नजरेने विचारल.

भाडेकरू?

नाही तर! अरे हो माधव हो. तो भाडेकरू नाही अप्पांच्या खास मित्राचा मुलगा आहे तो, कोल्हापूर वरून आला आहे.

अच्छा! छान छान, नाही त्या दिवशी संध्याकाळी तुझ्या घरी आलेली तेव्हा भेट झाली.

पैलवान भारीच आहे ग, अगदी सिनेमातल्या हिरो सारखा वाटतो.आमच्या घरातुन तुमचे अंगण दिसते. पहाटे उठून सूर्यनमस्कार, करतो बघतच राहावे वाटते. तीचं तोंड भरून कौतुक काही संपेना.

हम्म बरं!! तुला कशाला आलाय एवढं कौतुक ग.

मला मात्र तिने माधवचं असं कौतुक केलेलं फार असं आवडलं नाही मी तिला हटकलं, मात्र तो विषय सोडून ती आता माझ्या लग्नाच्या विषयाकडे वळली,

काय मग आता तयारी चालु झाली असेल बाई साहेबांची, नवरदेव काय करतात ग तुझे? तिने उत्सुकतेनं विचारलं. कंपनी मधे

कामाला आहेत! - मी अय्या होय का? मस्तच आहे मग तर सर्व सेटल लाइफ मिळाली की तुला! ती उत्साहाने म्हणाली.

बर ते सोड दिसतात कसे ते सांग? तिने डोळे

मिचकावत प्रश्न केला.

कसे दिसतात?

वर्णन? मला त्यांच्या चेहराही नीट आठवत नव्हता, ज्याच्याशी आपण सात जन्माच्या शपथा घेणार त्याचा धड चेहराही पहिला नसावा. त्या प्रश्नाचं मात्र मला धड काही उत्तर देत येईना. टाळाटाळ करत दुसऱ्या विषयावर घसरून मी विषय बदलला.

रात्री जेवण झाल्यानंतर अप्पा खाली परावर जाऊन बसले होते. अबोला अजूनही संपत नव्हता, रेडिओवर गाणे लावून मी शांत पडून त्या संगीतमय दुनियेत हरवण्याचा प्रयत्न करत होते.मन मात्र या वेळी साथ देईना. अबोल्याने मन अस्वस्थ झाले होते. दिवसभर त्याचं पुढे मागे करण्यात जाई, त्याच्या गमती मध्ये मी आता हरवली होती का? स्वतःला ना जाणे कितीदा मी हे विचारले असेल. पण काही प्रश्न सुद्धा निरर्थक असतात, ज्याचे उत्तर शोधणे काही महत्त्वाचे नसते. मात्र स्वतःहून जाऊन माघार घ्यावी हे माझ्या स्वाभिमानी मनाला पटेना. शेवटी अप्पांचच रक्त होते मी. रात्री

डोळे बंद करून नव्या सहजीवनाची स्वप्न रंगवण्याचा प्रयत्न करत होते. नाहीतरी प्रत्येक तारुण्याच्या उंबरठ्यावर ती ओढ शृंगारलेली असतेच, तीच मला मोहित करत होती, तारुण्यात प्रणायसुखाची स्वप्न पाहणे गैर ते कसले! नव्या सहजीवनाचे स्वप्न रेखाटण्याचा केविलवाणा प्रयत्न मी करत होते, स्वप्नांच्या नाजूकश्या झोक्यावर बसून, त्या गुलाबी दुनियेत मन पाखरा सारखं तरंगू लागल.

सर्वांच्या नकळत गजरा आणून माझ्या केसात माळणारा तो, एकांतात मिठीत घेऊन साताजन्माची स्वप्न रंगवणारा तो परिकथेतील राजकुमार, भावी आयुष्याची अनेक स्वप्न रंगवत बसलेले दोन युगुल आपल्या भाव विश्वात मग्न.. अधीराग्नी ने आणलेली लाज लपवत गुलाबी गाल झालेली शिवनंदा आणि थरथरत्या हाताने शिवनंदा चे मुख हातात घेऊन प्रेमाने नेहळणार........ माधव.

हे काय .. माझं लग्न होणार . माझा प्रियकर माझा पती, मी चेहरा आठवण्याचा प्रयत्न करत होते मात्र त्या चेहऱ्यावर जणू माधवणे आपली छाप बसवली,

असे कसे स्वप्न पडले. माझ्या प्रियकराच्या जागी माधवाचा चेहरा मला का दिसतो याचे उत्तर काही मिळेना.एकांतातल्या त्या

विषयावर मात्र आता त्याचे चित्र कोरले गेले..माधव .. मला आवडतो का?

नकळत मनात निर्माण झालेली प्रीती मी काशी मिटवू मला कळेना. त्याचा अबोला छळतो मला, त्या पाषाणाला कसे सांगू रात्रीच्या जागरणाने जरा उशिरा जाग आली. अंगणात तो दंड बैठक घालत होता. कोवळ्या उन्हात त्याचे घामेजलेले शरीर चमकत होते.

नको त्या गोष्टीकडे मन आकर्षिले जात आहे.. दुसरं मन कडाडलं. बावऱ्या नजरेला आवर घालत मी माझं काम उरकायला आत पळाले. सकाळच्या न्याहारीला मात्र त्याने स्वतःहून माघार घेतली. अप्पा आधीच निघून गेल्याने आज काहीसा तो निवांत जेवत होता.

त्या दिवशी साठी माफ कर! त्याने हळू आवाजात म्हंटलं. अजूनही त्याने मान वर करून पाहिलं नव्हतं.

असो.!! मी त्याच लटक्या तोऱ्यात उत्तरले. खरं तर अबोला केव्हा संपेल याची मी आतुरतेने वाट पाहत होते. त्याला जाणवु नये म्हणून मी त्या लटक्या रागाचे अवसान आणलं! काल कशी हिम्मत केली मग स्वत्ताहून अप्पांना विचारायची? त्याने मोठ्या

उत्सुकतेने विचारलं "मग कोणाला घाबरते की काय मी"! मीही काहीश्या हिसक्याने उत्तर दिलं.

रागातून का होईनाही हिम्मत आली. उत्तमच की!! तो गालात हसत म्हणाला. मी चमकून त्याच्याकडे पाहिलं. हम्म्म्म.. स्वावलंबनाची व्याख्या कायही हळूहळू लक्षात यायला लागली बरोबर ना?

आपल्या मतावर ठाम राहायला शिकलो तर आणि तरच आपल्या मताला किंमत येते बर का नंदाबाई.!! त्याचं नेहमी असं काहीतरी सूचक बोलणं असे. काहीतरी शिकवुन जाईल असं असे!

म्हणजे त्या दिवशी? होय!! मुद्दामच तुझ्याशी भांडलो.त्या निमित्ताने का होईना तुझा स्वाभिमान जागा झाला.. तो डोळे मिचकावत म्हणाला.

त्याचीही नवीन शक्कल ऐकून मी डोक्यावर हात मारून घेतला. खरं तर त्याचे विचार माला फार आपलेसे वाटायचे, बागेतील बागकाम करता करता एकदा तो म्हणाला, नंदा तू दर दोन चार दिवसांतून येऊन कुंड्यांमध्ये माती मोकळी का करते? झाडांना खतपाणी करून पाणी देऊन त्याची मशागत करण्याची काय गरज? मी हसून म्हणाले, मुळांची माती मोकळी केल्याने झाडाच्या मुळांना वाढायला वाव मिळतो, ती अजून बहरतात फुलतात फळतात,

त्यांनाही आनंद होतो, ज्याचे मन मोकळे आणि प्रसन्न राहते त्याचे स्वास्थ्यही तितकेच उत्तम राहते.!!

वाह .. अचूक उत्तर. मग माणसाचेही तसेच असते होय की नाही.!! हो अगदी.!! मी काम करत करत त्याला उत्तरं देत आमचे संभाषण चालू होते.

हम्म मग काहीतरी मनात ठेवल्याने देखील नैराश्य आणि उदासीनतेकडे माणूस झुकतो! मन मोकळे करावे मनात असेल तर मनमोकळे पणाने बोलावे! शेवटी आपल्याही मनातली साचलेले मोकळे करणे गरजेचे असते तेव्हाच मन नव्याने बहरेल ना. .. माधव अनेक दिवसांपासून चे निरीक्षण बोलुन दाखवत म्हणाला. काहीवेळ शांतता पसरली, नंतर पसरलेल्या शांततेचा भंग करत मी माझ्या मनात सलणाऱ्या गोष्टी उलगडण्याचा प्रयत्न करू लागले. अप्पांची काळजी मनात सलत होती, माझ्या माघारी अप्पांचं कसं होईल. या घरात एकट्यानं उरलेल आयुष्य घालवणे सोपे नक्कीच नाही, स्वाभिमानी स्वभावाचे अप्पा कोणाचा आधार मिळावा म्हणून कधीच इच्छा धरणार नाहीत, मात्र तरीही एक आधाराची गरज असतेच ना!

आता या क्षणीही त्यांना गरज आहे ती फक्त आणि फक्त सोबतीची. माझे हात बांधलेले आहेत असं वाटतं नेहमी, शेवटी माणूस तो काय आयुष्यभर फक्त भविष्याच्या विचाराने जगत असतो, त्यांच्या मनातली उद्याची काळजी स्पष्ट दिसते, मन गहिवरून येते . काय करू? काहीवेळ शांतता पसरली, गालावर ओघळणारे अश्रू हळूच टिपले.तू जर ठरवले तर तू प्रत्येक गोष्ट साध्य करू शकतेस! पसरलेल्या शांततेचा भंग करत माधव म्हणाला. तू तर रणांगणात जायच्या आधीच शस्त्र टाकून रिकामी झालीस.!!

एक बाईमाणुस आहोत या विवंचनेतुन बाहेर पडून एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून विचार केला तरच मार्ग सापडेल! ।सोड तुला नाही कळणार माझ्या मनातली व्यथा.डोळयातील असावं टिपत मी वरची खोली गाठली.रात्री उशिरा डोळा लागला, स्वप्नातील विचित्र गोष्टी मला थांबवायच्या होत्या. मनातले माधव विषयीचे विचार मी करायला नको असे राहून राहून वाटत असूनही मन मात्र ऐकायला तयार नव्हते..

खर तर दिवसेंदिवस जवळ येत चाललेल्या लग्नाच्या विचाराने दिवसेंदिवस मन ढवळून निघत होत.

कधी कधी वाटे सरळ जाऊन माधवाला आपल्या मनातल्या भावना मोकळया करून द्याव्यात.

अप्पांना सांगून टाकावं मला इतक्यात लग्नच करायचे नाही!! छे.!! आहे तस चालून दिले तर आणि तरच उत्तम असे शेवटी मी स्वताला सांगे.

दिवाळी आता तोंडावर आली होती, महाविद्यालयात परीक्षा चालू झाल्या, मीही पहिल्या वर्षाच्या सहामाही परिक्षा दिल्या. वार्षिक परीक्षा नशिबी नाही हे माहीत असूनही. एक आशा म्हणून

.

माधवला दिवाळीसाठी सुट्टी मिळाली, दोन दिवसात तो गावी जाईल, । त्याला मनातले सांगावे का?

तो समजून घेईल? त्याच्याही मनी सारख्याच भावना असतील? त्याने रागवून माझ्याशी बोलणे टाकले तर? अप्पांना कळले तर अप्पा काय म्हणतील? ।असे कित्येक प्रश्न मनात साठून एकमेकांशी हुज्जत घालत होते. सकाळीच त्याने पंधरा दिवसांत परत येतो असे सांगून घरचा रस्ता धरला.

त्याच्या आठवणीने मन व्याकुळ होई . परक्याघरी जाऊन आता कोना अनोळखी बाहुपाशात स्वताला झोकून द्यायच्या कल्पनेने आता मन बावरते .

दुसऱ्या कोणाचा विचारही नको असे मन म्हणते! योग्य काय आणि अयोग्य काय. एकाच गावच्या दोन नद्या. ।अल्लड तारुण्यबहरातले तरुण मन एखादी प्रतिकृती मनाशी सजवते. आपल्या सहजीवनाची सोबती अशीच काहीशी असावी असे गृहीत धरते, त्याला साजेशी अशी आकृती नजरेस पडली की वाटते हेच ते ज्याचा शोध आपण घेत होतो!!

अगदी माधवाच्या बाबतीत असेच काहीसे मनी येत असे.बाहेर दिवाळीचा उत्सव चालू झाला, .मात्र आमच्या घरात स्मशानशांतात पसरलेली असे.

हल्ली माधवणे खाली समान हलवल्याने त्याची बडबड काहीशी कमी ऐकायला मिळते, आता तर आवाज ऐकायला कान आतुर झाले होते,

मी दिवस मोजत होते. रोजचा दिवस वाट पाहण्यात जाऊ लागला. शांतसमयी वाटे, तो आता म्हणेल नंदाबाई जेवण मिळेल का या भुकेल्या जीवाला.!!

तर कधी आग पोरी का अशी शेवटच्या घटका मोजत असल्या सारखा चेहरा करून बसली आहेस. जरा हंस की! माणसाने कस टवटवीत फुला सारख असावं, जो पाहिलं त्याचं मन

देखील प्रसन्न व्हायला हवं! असे कित्येक गमतीशीर वाक्य तो म्हणत असे.

त्याला परत यायला अजून चार- पाच दिवस बाकी असतानाच तो माघारी आला. मनातुन फार आनंद झाला मात्र त्याच्यासमोर बोलून तेवढं दाखवलं नाही.

आता मी त्याच्यापासून शक्य तेवढं लांब राहण्याचा प्रयत्न करू पाहते आहे.मोजके बोलणे कमीत कमी संपर्क येईल अशा पध्दतीने माझे वागणे त्यांच्याही लक्षात आले असावे.त्याने एक दोनदा हाटकल्यावर माझ्या भावनांचा बांध ढासळू लागला. भावनेच्या भरात भलते सलते नको म्हणून मी स्वतःला सावरून घेई.या सर्वात मात्र आज पर्यन्त मला त्याच्या मनाचा ठाव मात्र लागला नाही! त्याच्या मनी माझ्यासाठी भाव असतील का? या अगंतुक प्रश्नानं माझं मन कुरतडून टाकायला सुरवात केली होती .काय करावे ज्यांने मला ठाव लागेल त्याच्या मनाचा? प्रश्न नेहमी प्रमाणे निरर्थक!!

## माधव

संध्याकाळी उशिरा कोल्हापुरास पोहोचलो, तिसऱ्या प्रहरापासूनच बैलगाडी सजवून सदाशिव अण्णा माझी वाट पाहत फाट्यावर उभा होता, लांबून हात हलवणारी त्याची पुसटशी आकृती नजरेस पडली, तो नजरेस पडताच प्रवासात थकल्याने संथगतीने पडणाऱ्या पावलांना वेग आला. घाईनं चालत त्याच्या पर्यत पोहोचलो.कितीतरी दिवसांनी आपल्या जिवाच्या माणसाला भेटल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

माधवा.!

आलास काय रं. लै वाट पायली बग.तुझी चुकामुक व्हायला नको म्हणून यरवाळीच येऊन बसलो हुतो.!!

यं बस.!! त्यानं घाई घाई हातातली ट्रंक गाडीत ठेवत मला बसायला जागा करून दिली. बऱ्याच दिवसांनी गाव पाहत होतो. संध्याकाळचा थंड वारा अंगाला गारवा देत होता.काय रं सदाअण्णा .. घरी समंदी कशीयत. बरी हायं ना समंदी.! आयं, बा,

शकू वैनी, शिरपा, त्याची बायकू सविता वैनी अनं आपली समदी चिल्ली पिल्ली कशी हाईतं?

मी सदाअण्णाला एका मागे एक प्रश्न विचारत सुटलेलं पाहून तो माझं बोलणं थांबवत उद्गारला., आरं.. हो हो.. समदी बरी हाई. अन पोरांची म्हणशील तर लै आठवण काढत्यात बग तुझी., माधवकाका कव्हा यनार. कव्हा येणार म्हणून वातं आणत्यात.

मागल्या आठवड्यात तुज पत्र आलं तवा पासून नाचायलेत. घरला चल मंग तुला म्होरं पायल्यावं कशी धिंगुडच्या घालत्यात बघ. ते सांगताना सदा अण्णाच्या चेहऱ्यावर साठलेला आनंद ओसंडून वाहत होता.

ते आपुलकीचे बोल ऐकून कधी एकदा वाड्यावर पोहोचतो असं झालं होतं.! खडखड करत गाडी घरच्या कच्च्या रस्त्याला लागली, घुंगरमाळाचा आवाज शिवारात घुमायला लागला, गावाच्या पलीकडे, शेताच्या वाटेवर आमचा वाडा होता,. धनधान्य अनं मान सन्मान मोप होता. गावात नाव होतं. आमच्या वडिलांना आम्ही दादा म्हणत असू. तेही दाराकडं डोळे लावून बसले होते. आजूबाजूला लांबलचक पसरलेल्या ऊसाच्या शेताकडे बघत होतो. .

खडखडणारी बैलगाडी वाड्या समोर येऊन थांबली.

तशी बाई माणसांची लगबग ऐकायला आली.

आईने माझ्यावर भाकर तुकडा ओवाळून टाकला.

मायेनं भरलेलं मन, आपुलकीने जिव्हाळयानं आपल्याकडे पाहणारे चेहरे आणि काका आला! काका आला. म्हणून घरभर हुंदडणारे बाळगोपाळ तो आनंदाचा सोहळा पाहून मन समाधानाने न्हाऊन निघालं! एवढे प्रेम जिव्हाळा आपुलकी कितीही धनदौलत लुटली तरी विकत घेता येत नाही हेच खरे.!! ते पाहून कोमेजलेले अण्णा आठवले.! त्या घरातील ती भकास शांतता आठवली. आणि आपल्याजवळ आंनद नाहीच अशी समजूत घालून घेतलेली नंदा आठवली, कुठून तरी अनाहूतपणे आंनद येऊन आपल्या आयुष्यात कायमचे बिऱ्हाड करेल या विचारात हरवलेली ती . तिला आठवून क्षणभर अस्वस्थ वाटले! पण ते तेवढ्या पुरतेच. माझ्या मायभूमीची नवलाई आज अपूर्व आनंदाची कारण बनली होती. इथे येऊन मन पुन्हा उल्हासाने भरून गेलं.घरभर फिरून पुन्हा पुन्हा वाडा आपल्या नजरेत साठवत होतो.पहिल्या पगारातून घरातल्या सगळया लहानमोठ्याना मी भेटवस्तू आणल्या होत्या.

पुण्यातून खास बच्चे कंपनीसाठी मिठाई, आईसाठी शालू आणि दादांसाठी नवा धोतर जोड आणला होता. आता चिल्ले पिल्ले तर माझ्यावर भलतेच खुश झाले होते.आईनं आल्या आल्या

माझ्या आवडीच्या तांबड्या पांढऱ्याचा बेत केला! झणझणीत तर्रीवर ताव मारत जेवण केलं.आयं.. आगं आता अजून खाल्लं तर फुटनं म्या.! असं म्हंटल्यावर आईनं हात आखडता घेतला.आपलं लेकरू कितीतरी दिवसाच उपाशीच आहे असे काहीसे भाव तिच्या चेहऱ्यावर पसरले होते. ती हट्टानं वाढत होती.

शिवनंदाच्या हातालाही सुरेख चव होती. आईला कौतुक करून सांगिल्यावर ती काळजीच्या स्वरात म्हणाली, गुणांची हाय पोर! आता लगीन तोंडावर आलं. बावरली असलं बिचारी. कस व्हईल काय व्हईल या ईचारांन मन थाऱ्यावर नसंल तीच.

त्यात ती आईविना पोर कुणी बाईमाणुस बी न्हाई समजून सावरून सांगायला! आई काळजीनं हुरहुरली.त्याच शांतपणे जेवण उरकवत मी ताटाला नमस्कार करून उठलो.! आईच्या मुखातील आईविना पोर.! हे वाक्य कानावर बराच वेळ घुमत राहिलंlतसाच खोलीत गेलो दिवसभराच्या प्रवासानं थकवा आला होता.आळस देत बाजेवर आडवा झालो.आज पुन्हा ती स्वप्नात आली. अगदी तशीच दिसत होती. सुंदर मोहक हसरा चेहरा, मातीनं माखलेल्या हातांनी केस सावरणारी ती . तिच्या सावळ्या चेहऱ्यावर तारुण्याची गुलाबी छटा पसरली होती, साडीमध्ये शरीराची सुबकता लक्ष वेधून घेत होती. काळेभोर टपोऱ्या डोळयांकडे एक टक पाहण्यात

मग्न असलेला मी .. माझ्या भेदक नजरेतली आतुरता तिने भाकली असावी, मुगजळात मी अधिकाधिक फसत चाललेलो मला जाणवत होते, मात्र तरीही मला आता यातून बाहेर येण्याची इच्छा नाही.कोवळया उन्हाची तिरीप अंगावर घेत, न्हाऊन ओल्या केसांशी खेळणारी ती, मागून चोरपावलांनी जाऊन तिला मिठीत घेतलेले माझे बाहू आता सुखावले आहेत. लाजेने चुर ती गुलाबी ओठांवरची कोवळी लाज लपवू पाहत आहे. आज मात्र मी ऐकणार नाही हा लडिवाळ हट्ट आता मीही आता तिच्यापाशी धरला आहे.! अवखळ वाहणारी प्रीती. बहरून ओसंडून वाहणार तोच,.

दीर्घ श्वास सोबत मी जागा झालो.!

पुन्हा तेच,!!! .त्याच स्वप्न रंगात कित्येक दिवस मी आकंठ बुडत होतो... .. "माझ्या स्वप्नात येणं कधी थांबवणार अहेस तू नंदा".! जणू ती भोवतीच भिरभिरत असून माझा त्रासिक स्वर ऐकेल अशा अविर्भावात मी स्वतःशीच बडबडत, तांब्याच्या पेल्यातून पाणी घटाघट घशाखाली उतरून विचार बदलण्याचा भोळा प्रयत्न करू पाहत होतो की बाहेर कोंबड्याने बांग दिली.!! उठून ओसरीत आलो. तांबड्यात नेहमी प्रमाणे गडी माणसांची लगबग चालू झाली. गडी माणसं धारा काढून गुरांच्या चारा पाण्याचं बघून आता शेताकडे निघतील,

बाई माणसाची, जात्यावर दळण दळून ओढ्यावरून पाण्याचे हंडे आणण्याची लगबग सुरू झाली होती,

सगळे ओळखीचे, कॉलेजात असताना माझ्याकडं गुरांना चारा पाणी करायचं काम असे.!

पण आता माझ्याशिवाय कामं होऊ लागली होती, घरात सर्वात जास्त शिकून नोकरीला लागलेला मी पहिलाच असल्यानं माझं वाजवी पेक्षा जास्त कौतुक होई.

डोळे चोळत आजूबाजूला बघत होतो, की गोठ्यातून शिरपानं आरोळी दिली.

अरे माधवा उठला का? य हिकडं य.! म्हशीच ताज ताज दूध काढलंय. पितो का!

शिरपा माझ्याहून थोरला भाऊ माझी मस्करी करत म्हणाला..

नको बा.!! आता सवं न्हाई रायली, पचायच न्हाई उगा पंचायत व्हायची. माझं उत्तर ऐकून अण्णा, दादा आणि शिरपा तिघेही माझ्या विनोदावर हसले.

असा कसा रं पैलवान.!! आरं मर्दा तुझ्या वाणी हुतो तवा अख्खा तांब्या एका दमात संपवायचो अनं ते बी पयल्या धारेचं.! माझी मस्करी करत नेहमीच्या पाटीलकीच्या तोऱ्यात दादा म्हणाले.

घरातले लहाने अजून साखरझोपेत होते, की इकडे बायकांनी भाकरी थापायला घेतल्या.

व्यायाम आटोपून मी अंघोळ उरकली.

चुलीवर खरपूस भाजलेली भाकर, आणि उकळून

तळहातासारखी जाड साय पाहून पुन्हा एकदा भूक कळवळली.

किती दिवसांनी आम्हा भावंडांची पंगत एकत्र बसली होती, गोळामेळ्यानं चार घास जास्त गेले.

कोवळ्या उन्हाची तिरीप स्वयंपाक घराच्या अरूंद खिडकीतून आत आली, धुराचा वाऱ्यावर उठणारा हलका लोट उन्हात चमकू लागला, बायका तितक्याच तत्परतेने काय हवं नको ते बघत होत्या. आम्हा तिघांना असं जेवताना पाहून आई नेहमी म्हणायची, हा माझ्या राम लक्ष्मण भारताचा जोडा हायं!! तिच्या चेहऱ्यावर त्रैलोक्याचा सुख दिसायचं त्या वेळी.

दुधात कुस्करलेली भाकरीची गोडी, त्या पुण्यातल्या विकतच्या दुधाला तर अजिबात नाही.

अर्ध्यालावर पाणी घातलेले ते दूध पाहिले की मला घरच्या दुधाची आठवण होत असे!

म्हशीचं तांज दूध आणि त्यातला घट्टपणा पाहून वाटायचं एकदा हे तिकडे नेऊन दाखवावं. म्हणजे चहा मधेही मोजून मापून दूध टाकणाऱ्या पुणेकरांना खरे दूध कसे असते हे उमजेल .!! सदाअण्णासोबत शेताकडं निघालो. सकाळी सकाळी शेताला पाणी दयायची लगबग चालू झाली होती, मोटेने पाणी ओढत आमच्या आधी घटकाभर शेताकडं आलेला शिरपा दिसला .

विहिरीतून मोटेने पाणी काढत, तो आपल्याच नादात गुणगुणत गात होता. त्या गीताच्या तालावर सर्जा राजाच्या जोडीने देखील ताल धरला होता.मालकाच्या विश्वासावर चालणारी जोडगोळी पाहून, मन सुखवलं.

नवीन असं काहीच नव्हतं मात्र पाहण्याचा दृष्टिकोन बदलत होता.. नकळत मी शहरी जीवन जीवन आणि खेड्याकडच्या गावगाड्याचे वर्णन एकमेकांशी जोडू पाहत होतो.न्याहारीला झाडाच्या गारव्याला सर्जराजा विसावले.

शेजारी आम्हीही कांदा फोडून न्याहरी उरकली.

झाडाच्या गारव्याला टेकून उन्हाच्या तडाख्यात घटकाभर विश्रांतीच ते ठिकाण फारच सुखद अनुभव देत होत.

झाडाच्या बुंध्याला टेकत मी पुण्याच्या काही मोहक तर काही कटू आठवणींत हरवलो..

तो दिवस आठवला, दिवसभर घामाघूम होऊन मी अप्पांच्या घरचा पत्ता शोधत होतो. पुणेकर म्हणजे महाविचित्र प्राणी. अमुक अमुक ठिकाण कुठे असे विचारले तर भलतीकडेच नेऊन पुन्हा तुमचं कस चुकलं हे समजावून सांगणे कोणी यांच्याकडून शिकावे.

संध्याकाळी उशीराने पत्ता सापडला, फटक उघडून आत जाण्यासाठी पुढे सारसावलोच होतो की ती मला पहिल्यांदा दिसली.

लहान मूल जसे आपल्या आवडीच्या खेळण्याकडे कौतुकाने बघते अशाच काहीशा नजरेने मी पाहत होतो..

ही कोण? शिवानंदा? मी गोंधळल्या सारख तिच्याकडे पाहत होतो. तिने कोण? असे विचारले तर मला धड उत्तरही आठवेना आधीच उन्हाने कोरड पडलेल्या घशातून शब्द बाहेर पडायला कष्ट, त्यात वेगळयाच तंद्रीत हरवल्यानं मला उत्तर मात्र आठवेना. मी माधव गिरीधर पाटील. एक दमात माझं नाव पाट केल्या सारख घोकून दिल.

ती आमची पहिली भेट. ती शिवनंदाच होती हे काही वेळानं कळलं. तेव्हा मी नक्की कोणत्या गोष्टींमुळे एवढा हरवलो ते मात्र माझ्या लक्षात आलं नाही.

पुनः वाकडा विचार नको असे मनाशी ठरवले. नाहीतरी तरुण मन ते त्याला बांधून ते थोडीच ऐकते.

दुसऱ्याच दिवशी नवाकोरा शिवलेला सुटबुट घालून तयार झालो. कॉलेजात प्राध्यापकाच्या नोकरीसाठी पाठवलेला अर्ज स्वीकारला गेला होता. हातात नोकरीवर रुजू व्हा असे पत्र मिळताच मी पुण्याची वाट धरली होती. तसा मूळचा माझा स्वभाव हसरा असल्यानं मुलांना माझ्या विषयाचे तास फार आवडायचे. मध्ये सुट्टी असूनही चौथ्या तासाला मुलांची गर्दी उसळायची. कारण तासाभरात माझ्या वर्गात भरपूर हसू पिकायच. एकदा मुख्याध्यापक सरांनी तुमच्या वर्गातून शिकवण्या पेक्षा हसण्याचा आवाज जास्त येतो अशी खोचक तक्रार केल्यावर मी माझे हास्यविनोद जरा आवरते घेतले.तरीही विनोद केल्यावर मुलांना मी हळू आवाजात हसण्याची परवानगी देऊ केली होती.

एके दिवशी संध्याकाळी कामावरून परतत असतानाच अपघात झाला. समोरून येणाऱ्या एक ट्रक ने मी बसलो होतो त्या तीनचाकीसायकल रिक्षाला धडक दिली. खाली पडलो तेव्हा कुठला तरी पत्रा पायाला घसरून भली मोठी जखम झाली होती. अंगाला किरकोळ मुका मार लागला होता, पण जखमेतून भळाभळा रक्त वाहत असल्याने काहीसुचत नव्हतं, भोवळ येऊन

तिथेच आडवा झालो. थोडा सावध झाल्यावर नंतर कोणीतरी मला अप्पांच्या इथे आणून सोडलं. नंदाशी माझे फार बोलणे होत नसे, कारण ती फारच अबोल होती. पाहिले काही दिवस तर मला तिच्या नजरेत राग दिसायचा! मला भास होत होता, की खरंच तसं होतं हे मात्र कळलं नाही, कारण दुखण्यामुळे मी काही दिवस घरी राहिल्यानं तीचं माझ्याबद्दलच मत बदलल असावं. कारण आता अबोला सोडत ती पूर्वी पेक्षा खुलून वागायला लागल्यावर मला जरा बरं वाटलं. आजीबाईंशी तर माझी गट्टी जमली होती. तीही तिच्या तरुणपाणीच्या गावाकडच्या गोष्टी सांगे. माझ्या घरच्या गावगप्पा तिला फार आवडत.

ती निर्वातली तेव्हा मात्र फार दुःख झालं, त्या दिवसा नंतर अप्पा फारच एकटे पडल्यासारखे वाटायला लागले, फार मोजके बोलत, पहिल्या सारखे हास्यविनोद ते आता करत नसत. एकटे पडल्याचे दुःख त्यांच्या चेहऱ्यावर दिसू नये म्हणून त्यांचे केविलवाणे प्रयत्न तोकडे पडत. आजी कधी कधी गमती गमतीत म्हणायची. "माधवा थोडा आधीच आला असता तर तुलाच नातजावई करून घेतला असता रे".!! मी नुसताच हसून वेळ मारून नेली.!! पण त्या वाक्याने नकळत मनात एक हुरहूर दाटून गेली. त्या दिवशी मी तिला पुन्हा एकदा त्या नजरेनं पाहिलं. कदाचित पुढे काही होईल या आशेवर मी होतो, मात्र आपल्या मनातल्या

घालमेलीचा छडा मी तिच्या अल्लाडमनाला कधी लागू दिला नाही. ।

काहीच दिवसांत ती परकी होईल. कुणा दुसऱ्याच्या दुनियेत रमून जाईल. माझ्या मानातल्या सुप्त भावना मानातच राहतील तर उत्तम असे वाटून मी भावनांना आवर घालत असे. अप्पांच्या डोळयात मात्र आता एक अनामिक भीती मला दिसायला लागली, शिवनंदाचा माझ्याकडे वाढत चाललेला ओढा आता त्याच्या नजरेस पडायला लागला होता का? या प्रश्नाने मी काहीसा व्यथित झालो.

त्यासाठी शक्य तेवढे लांब राहण्याचा प्रयत्न मी करू लागलो. म्हणून खालच्या खोलीचं दार मी उघडायला लावलं.माझं समान तिथे हलवलेलं तिला फारस आवडलेलं दिसल नाही, ती माझ्यावर रागावली होती. मला तिचा अबोला नकोसा वाटे, मात्र

ती दुसऱ्याच दिवशी बागेत पाहणी करण्यासाठी म्हणून खाली आली तेव्हा क्षणभर वाटले.

तिच्याही मनी तेच असेल का?

नाही निखळ मैत्रीला नको ते नाव देने योग्य नाही असे मी स्वतःला बजावले.!

तिला कारण ऐकायचं होतं. खाली राहायला येन्याचं.

माझ्याकडे मात्र तिला सांगण्यासारखं काहीच नव्हतं, त्या संभाषणातील मजेशीर भांडणात,

झाडांना घालायला म्हणून मी टीपातून बादलीभर पाणी काढतच होतो की मला मस्करी सुचली, हाताच्या ओंजळीने तिच्यावर पाणी उडवलं, अचानक झालेल्या पाण्याच्या थंड माऱ्याने ती शहारली. चिडून माझ्यामागे धावत तिला माझ्यावर पाण्याचा मारा करायचा होता.

मी मात्र स्वतःवर पाणी काही उडू दिलं नाही, त्या लडिवाळ खेळात तिचा पराभव झाला म्हणून तिने काहीश्या नाराजीनेच गाल फुगवले, रुसलेल्या गुलाबी गालावर लटक्या रागाची छटा पसरली.

भिजलेल्या साडीत तिची मोहकता पाहून मी क्षणभर स्थिरावलो. तिचं ते अवखळ सौंदर्य पाहून क्षणभरात जगाचा विसर पडल्याचा भास झाला. ती भिजलेल्या साडीला ठीक करायच्या भाबड्या प्रयत्नात असताना मी मात्र तिची ती मनमोहक छबी मनात साठवण्याचा प्रयत्न करत होतो..

क्षणात कोणीतरी डोळ्यासमोर टाळी वाजवावी असा भास झाला. स्वप्न संपले.

ती लगबगीनं वर जाणाऱ्या जिन्यातून आत पळाली.

मी तर तिथेच उभा होतो, स्वतःच्याच विचारात हरवून तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत. ..।

माधवा.!!! अरे ये माधवा.!! हर्रर्र लेकाच्या कावा धरून बसलाय, जा शिरपाला थोडा हातभार लाव.! बिचारा सकाळपासून राबतुया.

सदाअण्णानि माझी विचारांची तंद्री मोडली.

अ!! व्हय व्हय. करतो की, "तो पुन्हा गेला बी हिरीवं.!! मला हाक बी नाय मारली "

लगबगीनं उठत मी स्वतःशीच बडबडत विहिरीकडे निघालो.. मळे आता चांगलेच बहरले होते. ऊस नुकताच तुर्‍यावर आला होता, पलीकडच्या शेतातील ज्वारीला देखील बहर आला होता, वाऱ्यावर डोलत हिरवीगार पानं भलतीच मोहक दिसत होती.संध्याकाळी घरी गेलो, आईने उकळायला ठेवलेला गरम गरम चहा हातात दिला. आई फक्कड गुळाचा चहा बनवायची, तशी चव पुण्यातल्या साखरेच्या चहाला देखील नव्हती.संध्याकाळी बालगोपाळांची मैफिल जमली.काका काय-काय असत शहरात!? मी असं ऐकलं लै मोठ्ठ्या मोठ्ठ्या इमारती असत्यात!

लै गाड्या असत्यात, खरंय का रे? व्हय असच असतंय, मीही हसत उत्तर दिलं.

काका काका, आज्जी म्हणत हुती आता आपल्याला काकी यणार म्हणून.!! ये मज्जा.. पिंट्या टाळी वाजवत नाचायला लागला.

ये.. मंग मी नवी कापड घेणार! लै मज्जा येणार.

पोर भलतीच आनंदात होती.आई ने बरीच स्वप्न रंगवलेली दिसतायत. स्वतःशीच म्हंटलं.

रात्रीच्या जेवणात, आई सवयी प्रमाणे मला जास्तीची भाकर वाढत म्हणाली, चार दिसांनी दिवाळी सुरू व्हाईल. उद्या लाडू करायला घेते..

अ.. मी काय म्हणते माधवा.!

हा काय? ।अ.. औंदा तुझं बी लगीन उरकून टाकावं असं दादा म्हणत हुते.!! ।

मी एक नजर दादां वर टाकली. दादा आईच्या बोलण्याला दुजोरा देत म्हणाले, उद्याच्याला पोरगी बघायला जाणार हओत. सकाळच्याला तयार रावा. अन जमलंच तर दिवाळी झाली की टाकू उरकून.!! काय म्हणता!! मला क्षणभर काय बोलावे ते सुचेना.

मला इतक्यात लगीन न्हाई करायचं.!! मी जेवण उरकत म्हणालो. म्हंजी? जलमभर काय असाच उंडग्यांवाणी फिरणार हाय काय? दादा काहीश्या रागानं म्हणाले. ते बघणं माझं म्या.!! मीही चिडून उत्तर दिलं.

बघा कसा बोलतुया त्वांड वर करून.! दादा आता आणखी चिडले.

पाहुण्यांना सबुद दिला हाय!!

कोणाला ईचारून केला कारभार?

म्हंजी ईचाराव लागत व्हय? चार बुक शिकला म्हंजी बापाहुन मोठा झाला?

मला शिकीवतोस? दादा कडाडले,

वाद शिगेला पोहोचण्याआधीच सदाअण्णाने मध्ये उडी घेत म्हंटलं, राहीलं.!!

दादा तुम्ही पण काय एवढं मानावं घेता, ।

आज न्हाईतं उद्या व्हाईल.!

मला पुढे काही ऐकण्याची इच्छा नव्हती.

गुपचूप जाऊन आपल्या खोलीतल्या अंथरुणावर पडून राहिलो.बराच वेळ फक्त कूस बदलायचं काम तेव्हड चालू होतं.

तासाभरानंतर घरातली आवारा-आवर झाल्यावर आई उशाशी येऊन बसली.आय!! मी आवाज दिला. ।आईने वाटी मध्ये तेल आणलं होत. आईच्या मांडीवर डोकं ठेऊन डोकं चेपून घेण्यात जे सुख असतं, ते जगातील सगळी संपत्ती लुटूनही मिळणार नाही. आई गाणं गुणगुणत डोकं चेपत बसली की गाढ झोप लागत असे. आज मात्र झालेला प्रकार तिच्यासाठीही नवा होता. आज पर्यंत कधीही मी दादांशी उलट वाद केला नव्हता. आईने मात्र झालेला विषय पुन्हा काढला नाही. ती तिची सवयही नव्हती.

आई.! मला इतक्यात लग्न नाही करायचे. ।

हम्म्म.. आई फक्त एवढंच म्हणाली.

काहीवेळ शांततेत गेला. शिवनंदा हाय व्हय तुह्या मनात? आईच्या अनपेक्षित प्रश्नाने मी पुरता गोधळलो . तुला कस कळलं?

मी आश्चर्याने आईला विचारलं. ।आई हसत म्हणाली. आरं नऊ महिने पोटात वाढवलंय तुला."अंगाखांद्यावर खेळून मोठा झालायस, नाय सांगितलं तरी बी तुझ्या डोळयात दिसतय की"! आल्या पासून हरवल्या वानी दिसतोस, काल पासून नंदा अशी नंदा तशी, तीच्या गोष्टीं करण्यात तू काही थकत नाई, मन जडल्या बिगर त्या गोष्टींचा एवढा इचार माणूस करत न्हाई!!

आईला माझ्या मनातले कुठून कळते माहीत नाही मात्र माझ्या मनाचा ठाव मात्र तिला अचूक लागला होता.

आई काय करू.. आग्. समद कळत बग पण काय वळत न्हाई.! ।लै येळा ठरिवलं आता याहून म्होरं इचार करायचा न्हाई, पण नाही नाही म्हणता मन तिथंच घुटमळत! तिच्या बा नं तीच लगीन आधीच ठरिवलं हाय! ।आता बोलून बी काय फायदा नाय.! माझा दुःखी स्वर तिला जाणवला..

लगीन ठरलं हाय.! झालं त नाय ना? आई पुन्हा हसून म्हणाली.म्हंजी? मी आश्चर्याने विचारलं.

म्हंजी "नशिबात काय असलं ते असलं पण अपुन प्रयत्न करणं सोडायच न्हाई"!

तू म्होरं हो मी हाय तुझ्या पाठीशी.!

आईच्या बोलण्याने नवी उभारी आली!

आता कधी एकदाचा जातो आणि शिवनंदा समोर मनातलं सगळं झोकून देतो असे झाले.

दिवाळी संपते न संपते तोच मी पुण्याचा रस्ता धरला, आता थांबणे नाही असं स्वताशीच घोकत मी वाट तुडवू लागलो.

## शिवनंदा

माधव जेमतेम दहा दिवसांतच परत आला, अचानक त्याला समोर पाहून ओस पडलेल्या कोरड्या मनावर कोणीतरी गुलाबपाणी शिंपडल्याचा भास झाला.

शेवटचा काही काळ का होईना. त्याच्या सहवासात जाईल या विचाराने मी सुखावले. त्याच्या सहवासातले क्षण मी मनाच्या कोनाड्यात साठवून ठेवायचा प्रयत्न करत होते., आता या नंतर व्यक्त होणे ते तितकेसे महत्त्वाचे नव्हतेच माझ्यासाठी, महत्त्वाचे होते ते फक्त त्याचे माझ्या सोबत असणे.! दुसऱ्याच दिवशी तो दुपारी माझ्या खोलीत आला., तेव्हा नेहमी प्रमाणे मी खरखरणारा रेडिओ मागे पुढे करून गाणे ऐकायचा प्रयत्न करत होते., माझ्या खोलीत एकटीच बसून मी गाणे ऐकत बसलेली असताना तो आलेला माझ्या काही लक्षात आलं नाही! दाराची कडी खडखड वाजली तो आल्याचं लक्षात आल्यानं लगबगीनं मी सावरून बसले! माधव. अरे कधी आलास मला तर कळलेही नाही. तू आल्याचं! आणि तिथे का उभा आहेस.. ये बस! त्याने मात्र यावर काही उत्तर दिलं नाही.. नाही नको. असुदे! तो अडखळत म्हणाला,

तुझ्याशी थोडं बोलायचं होत.! त्याच्या मनातला संकोच शब्दात उतरत होता ..

अरे.! मग बोल ना.

विचारतोस काय? . मनात काही असेल तर बोलून मोकळे व्हावं असं तूच म्हणतोस ना? मी हसून त्याच्याकडे पाहिलं. काही वेळ त्याच्या चेहऱ्यावर गोंधळलेले भाव दिसत होते.!

अरे बोलतोय ना! ऐकतीय मी! त्याचा गोंधळला चेहरा पाहून मी त्याची विचारांची मुद्रा भंग करत मी विचारलं?! अ.. काही नाही.!!

तो आपली गोंधळली नजर लपवत तो दाराकडे वळला.

झरझर पावलं टाकत निघणारच की त्याची पाऊले अडखळली.मागे वळून त्याने एकवार माझ्याकडे नजरेस नजर दिली आणि कदाचित माझ्या नजरेतली शुब्धा त्याने भाकली असावी.पण ओठांवरचे ओठातच राहिले. तो पुन्हा धिम्या पावलांनी आत येत म्हणाला. काय मग कुठवर आली तयारी नवरीबाईची.! मीही बघतो अप्पांना विचारून काय हवं नको ते मानपानात काही कमी पडायला नको! असं काहीसं तो पुटपुटलेला तो त्याच्या चेहऱ्यावरचं ते उसनं हसू माझ्या लक्षात आल्या वाचून

राहील नाही. तो माघारी जाण्यासाठी मागे वळला होता . मी तशीच दारात उभी होते. निशब्द.

माधवाच्या ओठांतले ओठांतच का राहिले असावे याचा विचार माझं भाबड मन करत होत.नेहमी मनात असेल ते स्पष्ट आणि ठामपणे बोलावे असे त्याचे बोल कानात घुमत होते.त्याच्या मनी तेच असेल का?

आणि असेल तर? मनात हजार प्रश्न होतेच तरीही या वेळी मी माझी बाजू मांडली नाही तर ती अंधारात राहून जाईल! आपण प्रयत्नच केले नाही अशी हुरहूर मात्र कायमची राहून जाईल.

थांब माधव.!!!

मनातली सगळी ताकद एकवटुन मी त्याला साद दिली. तो मागे वळला, भिजल्या डोळयांनी मी जमिनीकडे पाहत उभी होते.

" तुझ्या मनाचा ठाव मला आजवर काही लागला नाही". मात्र माझ्यामनी फुललेली प्रीती तरी तुझ्यापर्यंत पोहोचलीच असेल असे वाटू लागले. म्हणून हा प्रयत्न

त्याने चमकून वर पाहिलं.!

म्हणजे? तुझ्याही मनात आहेच तर? त्याच्या चेहऱ्यावर स्वर्गीय आनंद ओसंडून वाहू लागला

मी अजूनही तशाच पाणावल्या डोळ्यांनी जमिनीकडे टक लावून एक एक वाक्य मोजून मापून बोलत होते.

नकळतपणे घडलेल्या गोष्टींना सहसा आवर कसा घालावा हे कळत नाही!! त्याला मात्र माझ्याही मनात तेच आहे हे ऐकून फारच आनंद झालेला दिसला, त्याचा कोमेजलेला चेहरा, आनंदाने फुलला. तुझ्याही मनात तेच आहे? त्याच्या शब्दांत कमालीचा आनंद भरला होता. आनंदून त्याने दोन पाऊलं पुढे होत जवळ येण्यासाठी हालचाल केलेली मला जाणवली,

मी त्याला रोखत तिथेच थांबायची खूणही केली. माझा रोखलेला तळहात पाहून, तो जागीच थबकला क्षणभर चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद क्षणातच विरला.

अप्पांन्नी माझं लग्न ठरवताना माझ्या इच्छेचा विचारही केला नाही! “बाई तुला मुलगा पसंत आहे का ग? “ असेही विचारले नाही. तरीही ते म्हणतील तस ऐकत आले त्यांच्या मर्जी प्रमाणे वागत आले, आणि आता यापुढेही असेच होईल. शेवटच्या वाक्याला काहीसं जोर देऊन म्हंटलले त्याच्या ध्यानी आलं! म्हणजे आप्पांच्या मर्जीने तू आयुष्य जगणार? त्याच्या आवाजातला निराशेचा सूर मला जाणवला. "हो तस समज हवं तर".!! माझा तटस्थ सूर कायम होता.

त्याच्या चेहऱ्यावरच्या आनंदाची जागा आता मात्र नाराजीने घेतली.

अप्पांना बोलूया का? त्याने मार्ग सुचवण्याचा प्रयत्न केला.

काही उपयोग नाही. मुळात अप्पांना हे प्रेम वगैरे असे विषय थोतांड वाटतात. आणि अप्पा दिलेला शब्द जीव गेला तरी मोडणार नाहीत! तुझ्या विषयी अप्पांना फार फार जिव्हाळा आहे. अप्पांना कळले तरीही त्याचा दोष तुलाच देतील! परीणामी घरातून बाहेर काढायलाही कमी करणार नाहीत! तुझ्या इतक्या दिवसांचा निर्मळ सहवासा मला पुरेसा आहे. अप्पांची मर्जी आणि आनंद हेच माझ्यासाठी सर्वस्व आहे.! माझ्या आवाजातला कंप त्याला जाणवू नये म्हणून मी डोळयात ओघळणारे पाणी लपवत आत पळाले.

तो शून्यात हरवून कितीतरी वेळ तिथे उभा होता. जाताना एक गोष्ट तो मोठ्याने बोलून गेला.तू कितीही नकार दिलास तरीही मी तुझी शेवट पर्यंत वाट पाहीन! मी प्रयत्न करावे अशी इच्छा धरू नकोस कारण जो पर्यंत तू अप्पांसमोर मला स्वीकारत नाही तो पर्यंत मीही काहीच करु शकत नाही!! झपझप पावले टाकत तो धडधड जिना वाजवत दिसेनासा झाला.!

**माधव.**

त्या दिवशी चा प्रसंग आठवून डोक्यात दुःख, राग, विरह, तिची वाटणारी काळजी, आणि आपल्या विखुरलेल्या स्वप्नांची रांगोळी सगळं काही एकवटून आलं .तिला माझ्या मनीच्या भावना सांगायच्या आधीच तिने ते ओळखलं. आणि सोबत आमचे नातं एका अंधाऱ्या खोलीत कायमचे बंद करून टाकलं.

काही मार्ग नाही असे कसे म्हणू शकते ती?

ते काहीही असो जो पर्यंत ती प्रामाणिक प्रयत्न करत नाही तो पर्यंत मीही काहीच करू शकत नाही. हे तिलाही कळायला हवे. नाहीतरी म्हणा आता तिनेच नकार दिला तर मी तरी काय करू शकणार होतो.! या गोष्टीला आता आठवडा होऊन गेला असेल,

मी कामांना आता वेग दिला! खाजगी शिकवण्या चालू करून त्यातच जीव रामवायला लागलो. जास्तीत जास्त वेळ ग्रंथालयात पुस्तक चाळण्यात जातो. मन कुठेतरी गुंतून ठेवले की डोकं शांत राहत.

आता आमच्यात संवाद संपला आहे. अबोला आता कायमस्वरूपी म्हणून बिर्हाड करेल असेच वाटते!

अप्पांना हवं नको ते बघणं एवढंच काय ते बघतो,.

बरेच दिवसांपासून आपल्याकडे राहतो आहे भाडेकरू म्हणून माझा हिशोब करा असं मी अप्पांना एकदा सुचवलं. ते मात्र त्यांना काही फारसं रुचलं नाही.

माझ्या आशा बोलण्याने ते ते दुखावले तर नाही ना अशी हुरहुर मला लागली. लागलेच तर माझ्याकडून मदत होईल ये विचाराने मी सुचवलं. अप्पा त्या विषयावर हसत म्हणाले., अरे माधवा भाडेकरू ठेवायचा असता तर केव्हाच ठेवला असता रे तू तर माझा लेक आहेस घरातल्या माणसाकडून कसला मोबदला घ्यायचा रे!

आणि मी तर म्हणतो नंदाच्या लग्नानंतर तूही आपले बिर्हाड इथेच थाटले तरी माझी काही हरकत नाही बघ.!! अप्पांच्या त्या जिव्हाळयाच्या आपुलकीच्या बोलण्याने मन अगदी भरून जाई.! ।अशा परिस्थितीत त्यांना आमच्या प्रेमाबद्दल सांगणे म्हणजे त्यांचा माझ्यावरचा विश्वास संपुष्टात आणल्या सारखंच होतं.! दिवस सरत होते, लग्न आता पंधरवड्यावर आलं. अप्पांच्या सांगण्यावरून मीही दहा एक दिवसांची सुट्टी टाकली.अप्पा एकदा मला म्हणाले, नंदाच्या चेहऱ्यावर मात्र तितकासा आंनद दिसत नाही. मी चमकून आप्पांकडे पाहिलं क्षणभर आशेचा किरण उगवला!

" होते असे थोडे दिवस सासरची गोडी लागली की आपोआप रमेल संसारात".!!

समजावणीच्या सुरात त्यांनी स्वतःच स्वतःची समजूत काढली. ।मीही उसनं अवसान आणत हसलो.

कुठेतरी कोनाड्यात दडून बसलेली एक वेडी आशा देखील आता संपुष्टात आली होती. मनावर दगड ठेऊन मी आहे ते स्वीकारण्याच्या भाबड्या प्रयत्नात दिवस काढत होतो. ।आता मांडवदारी सजली, तोरणं लागली. पाहुण्यारावळ्याची गडबड ऐकायला येऊ लागली. नवरी सजली होती, सुंदर नक्षत्राप्रमाणे काळजाचा ठोका चुकत चालेला मला जाणवत होता.

हळदीसाठी लगबग झाली. घरभर मिरवनाऱ्या करवल्या आणि हळद घेऊन उंदडणारी बारकी पोर सुद्धा आली होती. घरून सगळयांना तर येणे शक्य नसल्याने दादा आई आणि सदाअण्णा दोन दिवस आधीच येऊन धडकले होते.आई कधी नव्हे तर साज चढवून लगीन घरात वावरत होती, घरातल्याच बाईमाणसासारख काय हवं नको ते बघत तिची लगबग चालू झाली.।पाहुणे जमले हळद झाली, लग्नाचा दिवस उजाडला।तिच्या चेहऱ्यावर मात्र जणू तिने नव्या नवरीच लजरं अवसान आणलं होतं, मला मात्र हे पाहण्यात काहीच रस नव्हता, थोडा वेळ बाहेर जाऊन यावं म्हणून

मी दारातून मागे वळलो तर सदा अण्णा मला हटकत म्हणाला, अरे माधवा आता घटकाभरात लगिन लागलं, आता कुढं निघाला? अ.. काय नाय! हाय इथंच. नाविलाजाने का होईना आयुष्यातला सगळ्यात कटू क्षण डोळ्यांदेखत अनुभवावं लागत होता.. ते सर्व डोळ्यासमोर पाहण्यापेक्षा जिथं इथल्या सनई चे सूर ऐकू येणार नाहीत अशा एखाद्या ठिकाणी जाऊन बसावं असं वाटत होतं. दुपारी बाराचा मुहूर्त आहे बरं का? चुकायला नको असं अप्पा राहून राहून सर्वांना बजावत होते. काल पासूनच उतावळा नवरदेव देखील येऊन बसला होता. खालच्या खोल्या नवरदेवकडच्या पाहुण्यांनी भरून गेल्या होत्या. सतत वाजणारे सनईचे सूर नकोसे झाले असले तरी तिथं उभं राहून चेहऱ्यावर हसू ठेवून हे काम मी चोख करत होतो, स्वतःला बजावले असले तरी नवी नवरी कशी दिसते हे पाहण्याची उत्सुकता होती.

तिच्या खोलीकडे थोडा घुटमळून आत नजर टाकली, करवल्या मुलींच्या घोळक्यात ती काही नीटशी दिसेना.

तसाच जेवणाची तयारी कुठपर्यंत आली ते पाहायला पुन्हा अंगण गाठलं! ।खाली गेलो तर नवरदेवाची भलतीच धावपळ दिसत होती. भला माडा सारखा उंच सडक नवरदेव अंगाने तर कडीमोड होता, फुंकर दिली तर उडेल अश्या आशयाचे म्हणालात

तरी चालेल. तो कडीमोडया नवरदेव मला काही आवडला नाही. पण मला आवडून न आवडून काय उपयोग.

नवरदेव कडच्या लोकांचे चहापाणी सदाअण्णा बघत होता. आररर ये.. माधव. नवरदेवाला तयारी करू लाग ये.. असे म्हणत सदाअण्णा मला हाक मारू लागला.. नको नको अर्रे मला कामं हायती.! येतो थोड्या येळानी, असं काहीसं कारण पुढे करत मी तिथून सटकलो. ।। लग्नघटिका जवळ येत होती, गुरुजींनी पूजा सुरू करून नवरदेवाला बोलवा असं सांगून बराच वेळ झाला तरी नावदेवाचं काही उरकेना! असो. ते येतील थोड्या वेळात तुम्ही मुलीची पूजा आधी उरकून घ्या असं अप्पांनी सुचवलं.! सांगितल्याप्रमाणे, ती बाहेर आली. डोळयात भरून घ्यावं असं ते रूप मी शक्य तेवढे मनात साठवून घेण्याचा प्रयत्न करत होतो. तिला मात्र काही चिंता दिसत नव्हती. नववधुच्या चेहऱ्यावर असते अगदी तशीच गुलाबी लाज तिच्या मुखावर पसरली होती. पाटावर नवरी आता ताटकळत बसली होती, नावरदेव काही मांडवात यायला तयार होईना, मला स्कूटर नको मोटारगाडीच हवी असा हट्ट धरून तो बसला होता. होतं नव्हतं ते सारं एकवटून लग्नाचा खर्च करणारे अण्णा त्यांनी खिशात जास्तीच गणित नसतानाही पाहुण्यांपुढे नाचक्की नको म्हणून नंतर देतो असे सांगून काबुल केलं.

तर हा मोठा बहाद्दर, नाही मला नंतर नाही आत्ताच पाहिजे म्हणून हट्ट करून बसला. पाहुणे खोळंबले, सनई चौघडयावाल्यांनीही तो सावळा गोंधळ पाहून आपला ताफा थांबवला. नवरदेव काही हट्ट सोडायला तयार नाही हे पाहून अप्पा काहीसे नाराज झाले.

मी लगबगीनं अण्णांच्या मागे गेलो, ते तरातरा चालत वरच्या खोलीकडे आले होते, माझ्याही आधीपासून सदाअण्णा तिथे हजर होता! त्यांच्यात काय खलबत झाली कोणास ठाऊक, पण नवरदेव काही हट्ट सोडायला तयार नव्हता. आता लगेचच्या लगेच कुठे यांना मोटारगाडी आणून देणार असं म्हणून अप्पा काहीसे गंभीर झाले! पाहुण्याराहुळ्यात कुजबुत चालू झाली. अप्पा पुन्हा एकवार समजुतीसाठी म्हणून खाली उतरले मात्र या वेळी वाद शिगेला पोहोचला!

नवरदेव मंडपात न येता सरळ माघारी फिरला!

आता मात्र अप्पांचा संताप अनावर झाला होता.

नवरदेवाच्या आई वडिलांनी आम्ही त्याची समजूत काढत परत आणतो असं सांगितलं.!!

एवढ्यात

बास.!! आप्पा त्यांच्या नेहमीच्या राकट दम भरल्यासारख्या आवाजात कडाडले तशी मांडवदारी शांतता पसरली. झाला तेवढा अपमान खूप झाला, तुम्हाला नसेल करायचे लग्न तर काही बळजबरी नाही. अप्पांचा रुद्र अवतार पाहून पाहुण्यांवर काढता पाय घेण्याची वेळ आली.सगळे आता समजायचं ते समजून गेले. अप्पांनी उभ्या असलेल्या पायरीवरच मटकन बसून घेतलं. तेवढ्यात मागून दादांचा आवाज कानी आला! मुकुंदा झालं गेलं गंगेला मिळालं सोड आता. झालं गेलं म्हणजे? आता भरल्या मंडवातून नवरदेव निघून गेला कोण लग्न करणार आता माझ्या नंदाशी? अप्पांचा आक्रोश त्यांच्या शब्दात उतरला होता! हा तिच्या एवढंच ना! माझा माधव करील की.! का रे माधवा राहतो ना लग्नाला उभा? ।आता मांडवातल्या उरल्या सुरल्या सगळ्या वऱ्हाड्यांचा नजरा आता माझ्यावर खिळल्या. त्या अनपेक्षी प्रस्तावाने मी गोंधळलो, मला काय बोलावे तेच सुचेना.! मी भांबावून आजूबाजूला पाहतच होतो की जगातील महाश्चर्य आश्चर्य समोर दिसलं, अप्पा चक्क शिरावरचा फेटा हातात घेत माझा हात हातात घेऊन म्हणाले.माधवा.! माझ्या नंदाला पदरात घे! माझ्या उत्तराचीही वाट न पाहता, सदाअण्णाने शिताफीनं माझ्या तोंडात पेढा कोंबला. चला सगळे लग्न मंडपात, दहा मिनिटात आणतो नवरदेवाला बाशिंग बांधून.!! असं म्हणत त्याने ओढतच मला

खालच्या खोलीत नेलं. नवरी मुलगी अजूनही तिथेच पाटावर आशा काही विश्वासानं बसून होती. जणू आपल्या मनातला नवरदेव आपणहून चालत येईल अशी. अजूनही मी स्वप्नात तर नाही ना असं वाटत होतं, अण्णानं घाईनं त्याच्या पिशवीतून नवा कोरा सदरा काढला. अन मला चढवला. ते पाहून वाटलं हा तयारीनेच आला होता की काय? कपाळाला मुंडावळ्या बांधत घाईनं मला चार बोट उष्टी हळद लागली. अन पुढच्या पंधरा मिनिटात शिवनंदा मुकुंद सुर्वे हे नाव बदलून माधव शिवनंदा माधव पाटील असे झाले! मला तर अजूनही हे स्वप्न की सत्य यातला फरक कळत नव्हता. खरे की खोटे बघावे म्हणून एकदा हळूच हाताला चिमटा घेऊन पहिला. या गडबडीत एकवार मी नांदाकडे नजर फिरवली, तिने गालात हसत हलकेच डोळा मारला.. अरे हे चालले काय हेच मला कळेना. मी पुरता गोंधळून गेलो होतो.ही माया केली कुणी ते काही कळेना..,

आरं लेकाच्या.! तुला काय वाटलं नाटक काय फकस्त तुलाच करता येताय व्हय!

आरं आईनं माझ्यापाशी येऊन तुझ्या मनात नंदा हाय

असं सांगितलं, तवा आल्या आल्या म्या नंदा ची गाठ घिऊन तिला संमद इचारलं. आई पुढं ती रडायला लागली.

अन तव्हा म्या नंदाला तिथच सबुद दिला अन सांगितलं, काळजी करू नको.

"आता नवरदेव मांडवात कसा येतो ते मी बघतोच".!! लेकाचा आला हुता मोठा लगीन कराया! असा हुरळून दिला का हट्टच सोडिना! सकाळपासून खरं त्याच कामावर हुतो! सदाअण्णाच्या मोठ्यानं आपल्या बहादुरीचे वर्णन करत म्हणाला, त्याच्या कारामतीच सगळयांनाच हसू आलं.

कोल्हापूरास पोहोचल्यावर मात्र घरात भलतीच गडबड झाली. अचानक आणलेली नवी नवरी पाहून पोरांनी तर घर डोक्यावर घेतलं.. आनंद पुन्हा एकदा तिच्या चेहऱ्यावर दिसू लागलं. ती माप ओलांडून घरात आली. आईने दोघांची दृष्ट काढली. लक्ष्मीच्या पावलांनी घरात येणारी माझी लक्ष्मी पाहताना मी पुन्हा एकदा तिच्या प्रेमात पडलो. रात्री जेवणखाणं झाल्यावर आईने तिला आपल्या खोलीत नेलं. मी काहीसा खट्टू झालो. रोज सोबत असूनही आज मला कित्येक वर्षानी भेटलो आहोत असं वाटत होतं. कितीतरी मनातल्या गोष्टी बोलून बघायच्या होत्या. जा तू, झोप तुझ्या खोलीत, उद्या आईचा गोंधळ अनं पूजा होईल मंग सुरू व्हाईल तुमचा संसार! आई मला दाटवत तिला तिच्यासोबत घेऊन गेली. आईच्या मागे जाताना माझा खट्टू चेहरा पाहून ती

हळूच गालात हसली. हेच याचीच तक्रार आहे माझी अशी छळतेस ना मी स्वताशीच कुजबुजलो. स्वप्नपूर्ती काय असते याची प्रचीती आली, खरं तर नंदा माझी झाली, माझं लग्न झालं यावर माझा विश्वासच बसत नव्हता. दुसऱ्या दिवशीची गोष्ट, रीतसर पूजा आणि गोंधळ पार पडला, देवब्राह्मणांच्या साक्षीने आमच्या संसाराला सुरवात झाली. नजाने कित्येक दिवस ज्या सहवासाची ओढ लागली होती ती आज मिळणार या कल्पनेनेच मी शहारलो होतो. बराच वेळ माझ्या चौरंगावर पुस्तक चाळत पडलो होतो, लक्ष मात्र तिच्या येण्याकडेच लागून होते. बऱ्याच वेळाने कडी वाजली, ती दबक्या पावलांनी आत आलेली मला जाणवलं. पायात वाजणारे पैंजण पलंगापाशी येऊन स्थिरावले. अहो ऐकता का? तिने मधाळ स्वरात मला हाक मारली. माझ्याकडून उत्तर आले नाही. म्हणून तिने पुन्हा त्याच मदकतेने हाक मारली. अहो! ऐकता का? आता मात्र मी पाघळलो,

तरीही मनाचे भाव लपवत मी तक्रारीचा स्वर लगावला.

मला बोलायचे नाही!

का? नाही बोलायचं तर नाही बोलायचं! एवढं सगळं झालं मला सांगावं वाटलं नाही? मी शेवटी माझी तक्रारीची बाजू मांडली.

ओह म्हणजे यामुळे रुसलेत का पाटील.! ती लडिवाळ हसत म्हणाली.

हो रुसलोय आणि फक्त रुसलोच नाही तर राग पण आला आहे, तुला तर लग्न करायचं नव्हतं ना माझ्याशी तू तर आधीच नकार दिला होता मग हे नंतर काय घोळ घातला मला कळूही दिल नाही? मी चिडून उठून हातातलं पुस्तक टेबलावर ठेवत म्हणालो.

तिच्याकडे पाठ करून मी तिला पाहणे टाळत होतो करणं आधी मला माझ्या प्रश्नांची उत्तरं हवी होती, तिच्या उत्तराची वाट पाहत मी उभाच होतो की तिच्या नाजूक हातांचा विळखा माझ्या कमरेभोवती पडला,

अरे खरं सांगू का तू मनात नेहमीच होता पण मी स्वतःच्या मनालाही ते मान्य करण्याची मुभा दिली नव्हती. अप्पा त्यांचा शब्द मोडणार नाही हे चांगलंच माहितीही होतं मला, म्हणूनच त्यासाठी मलाच काहीतरी करावं लागेल असं वाटायला लागलं आणि मग सदाअण्णाची मदत घेतली. तू नकळत मनात पेरलेलं स्वावलंबनाचं बीज माझ्या मनात रुजलं, तेव्हा वाटलं काहीतरी करायचं असेल तर जोडीदारही तितकाच साथ देणारा हवा ना. अप्पांच्या काळजीने जीव कासावीस व्हायचा तू अप्पांना कधी अंतर देणार नाही हे मात्र पक्क ठाऊक होतं, आणि तुझ्याकडे पाहून तर हाच माझा जोडीदार

हे नेहमी वाटायचं. आणि आज ते पूर्णही झालं! कळलं ना माधवराव माझ्या मनात आलं तर मी काहीही करू शकते हा! ती हसून माझ्या मिठीत शिरली. त्या मिठीत मीही सुखावलो! रात्री एकांतात मात्र स्वप्न पूर्ण पूर्तीचा अनुभव आला .खिडकीतून येणाऱ्या चंद्राच्या शीतल प्रकाशात तिचा मोहक चेहरा ओंजळीत भरून नेहळताना ती अजूनच सुंदर भासू लागली. त्या गुलाबी ओठांचे रसपान करत सुखाच्या तलम धुक्यात जणू तुडुंब बुडून गेलो. तो सुखावणारा खेळ खेळताना सुखाच्या सरीत दोघेही न्हाऊन निघालो.

गावाकडचा नोरोप घेऊन आम्ही पुन्हा पुण्यास परतलो. नोकरीच्या नावाखाली मला राहायची सोय नाहीच असे सांगून आम्ही अप्पांच्याच घरी बिर्हाड मांडले. पुन्हा एकदा ते घर आनंदाने न्हाऊन निघालं.

जास्तीच्या शिकवण्या चालू असल्याने घरी सुद्धा विद्यार्थ्यांची लगबग असे. नंदाने हट्टाने स्वतःची खानावळ चालू केली. कॉलेजात जायचेही सुरू झाले. आमच्या नव्या संसारात अप्पाही नव्यान रमून गेले! आजही आप्पा माधवने माझी लाज कशी राखली हे मोठ्या उत्साहात रंगून सांगतात.

**पुस्तकाच्या कव्हरवर एक क्लिक करून पहा.**



**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.**

**स्वीटी महाले यांचं ई साहित्यचं हे दुसरं पुस्तक.**

यापुर्वीची त्यांची फुंकरीची वादळेही कादंबरी वाचकांना अतिशय आवडली. कथा रंगवण्याची त्यांची शैली, मानवी स्वभावातील बारकाव्यांची जाण आणि कल्पकता हे त्यांचे वैशिष्ट्य. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्या-मुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे कामही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत,

संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत.ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?